https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे अंक –१६६ | गुरुवार दि.१९ फेब्रुवारी २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-166 | Thursday, Dt.19 February 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4


# केंद्रीय मंत्र्याला पदावरून दूर करा अजितदादा अपघात प्रकरणात सर्वात मोठी मागणी

## हा घात नाही तर पूर्वनियोजित हत्याच – रोहित पवार





मुंबई /प्रतिनिधी

काका अजित पवारांचा मृत्यू हा फक्त अपघात नव्हे, तर घातपात (साबोटाज) असण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एक मोठे नेते विमान अपघातामध्ये मृत्युमुखी पडतात मात्र २२ दिवसात केंद्र आणि राज्य सरकारला अपघाताचे कारण स्पष्ट करता येत नाही आणि जसे जसे तपासातील तुरटी समोर येत आहेत त्यावरून हा अपघात नव्हे तर पूर्वनियोजित हत्या करण्याचा कट रचला होता का यामागे कोणती मोठी शक्ती उभी आहे हे सामान्य जनतेच्या समोर आले पाहिजे यासाठी मी एक प्रामाणिक कार्यकर्ता म्हणून ही बाब सातत्याने पुराव्यानुसार जनतेसमोर घेऊन येईल असा विश्वास आणि सरकारी यंत्रणेवर अविश्वास व्यक्त रोहित पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित दादा यांच्या मृत्यू मागील वास्तव सत्य मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

विमान अपघाताचा तपास संशयास्पद...

विमानातील ब्लॅक बॉक्स खराब अवस्थेत सापडला आहे, ज्यामुळे अपघाताचे अंतिम कारण समजायला अडचण येते. रोहित यांनी याबाबत तज्ज्ञांचे मत सादर केले.

The New Indian Express वैमानिक कंपनी

त्यांनी तडठ कंपनीवर गंभीर आरोप करत, कंपनीचे पूर्वीचे अपघात, नियमन, आणि सरकाऱ्या अधिकाऱ्यांशी त्याचे संबंध यांचा खुलासा केला.

पायलट आणि विमान संचालनावर शंका

पायलट, विमान परिचालन, देखभाल आणि विमानाची वैधता याबद्दल कठोर प्रश्न उपस्थित केले. त्यामध्ये पायलटच्या मागील अनुभवावर आणि बदललेल्या क्रूवरही संशय व्यक्त केला.

प्रमुख मागण्या:

न्याय मिळवण्यासाठी काय हवे?

सेंट्रल आणि आंतरराष्ट्रीय तपासाची मागणी

(उर्वरीत पान २ वर)



## परळी रेल्वे विकास समितीने महाव्यवस्थापकांना दिले विविध मागण्यांचे निवेदन

### प्रवाशांच्या सोयीसाठी नव्या गाड्यांची मागणी

परळी ।प्रतिनिधी

परळी रेल्वे विकास समितीच्या वतीने दक्षिण मध्य रेल्वे, सिकंदराबाद येथील महाव्यवस्थापकांना निवेदन देत परळी वैजनाथ रेल्वे जंक्शनवरील प्रवाशांच्या सोयीसुविधांबाबत विविध महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या आहेत. सुमारे १०० वर्षांचा इतिहास असलेल्या

(उर्वरीत पान २ वर)

## घरकुल योजनेची जिल्हा प्रशासनाकडून क्रूर थट्टा !

### ग्रामस्थांना घरकुलासाठी २ लाखांचा निधी तर डेमो हाऊससाठी १० लाखांचा खर्च.!

बीड ।प्रतिनिधी

शासनाच्या घरकुल योजनेअंतर्गत बेघरांना साधारण दोन लाख रुपयांचे अनुदान दिले जाते.मात्र बीड जिल्हा परिषदेच्या आवारात उभारण्यात आलेल्या डेमो घरकुलासाठी तब्बल दहा लाख रुपये खर्च करण्यात आल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेश) यांनी केला आहे. याबाबत त्यांनी जिल्हाधिकारी बीड तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.



घरकुल योजनेत केंद्र शासनाकडून सुमारे १ लाख २० हजार रुपये, राज्य शासनाकडून अतिरिक्त ५० हजार रुपये, मनरेगा अंतर्गत २६ ते २८ हजार रुपये आणि स्वच्छतागृहासाठी १२ हजार रुपये असे मिळून एकूण सुमारे दोन लाख रुपयांचे अनुदान दिले जाते. मात्र जिल्हा परिषद आवारातील डेमो हाऊससाठी ३१ जानेवारी २०२४ रोजी ४ लाख ९९ हजार २७८ रुपयांची वर्क ऑर्डर देण्यात आली. त्यानंतर ५ जानेवारी २०२६ रोजी आणखी ४ लाख ९९ हजार रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. अशा प्रकारे एकाच कामासाठी दोन टप्प्यांत सुमारे १० लाखांचा खर्च करण्यात आल्याचा आरोप आहे.

उभारण्यात आलेल्या डेमो हाऊसमध्ये एक लहान हॉल व दोन छोट्या खोल्या असून दोन लोखंडी दरवाजे, दोन मोठ्या खिडक्या व एक छोटी खिडकी बसविण्यात आली आहे.

(उर्वरीत पान २ वर)

## अफूचे शेतीवर स्थानिक गुन्हे शाखेचा यशस्वी छापा

### एका आरोपीसह ३ लाख ३१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त



बीड ।प्रतिनिधी

दिनांक १७.०२.२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा बीड यांना बातमीदारामार्फत खात्रिशीर बातमी मिळाली की, पोलीस ठाणे युसुफवडगांव हद्दीमध्ये मौजे सातेफळ येथे ईसमनामे बन्सी महादेव घाडगे याने त्याचे शेत गट नं १२७ मध्ये कांदयाचे शेतात अफुचे झाडाची लागवड केली आहे वगैरे माहीतीवरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदरील शेतामध्ये जावुन छापा मारला असता कांदयाचे पिकामध्ये बेकायदेशिर आफुचे पिक १० गुंठे जमीनीमध्ये लावण्याचे दिसुन आले.सदरील पिक हे अफु असल्याचे कृषी अधिकारी यांनी खात्री केली आहे. सदरील ठिकाणी छापा मारुन जवळपास १३ किलो २६० ग्रॅम वजनाची अफुचे झाडे असे एकुण किंमती ३,३१,५००/- रु जप्त करुन यातील आरोपी बन्सी महादेव घाडगे, रा सातेफळ ता. केज याचे विरुध्द पोलीस ठाणे युसुफवडगांव गुर. नं ४२/२०२६ कलम १५ गुंगीकारक औषधीदृव्य आणी मनोव्यापारावर परीनाम करणारे पदार्थ अधि. १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस ठाणे युसुफवडगांव हे करीत आहेत.

सदरील कामगिरी ही श्री नवनीत कॉँवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा,

(उर्वरीत पान २ वर)

## शिवजयंती म्हणजे उत्सव नव्हे तर प्रेरणेचा संकल्प.!

### समाजात एकात्मता व बंधुभाव वाढवणे हीच खरी आदरांजली..!!

बीड ।प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज जयंती हा केवळ उत्सवाचा दिवस नसून स्वराज्य, शौर्य, न्याय आणि राष्ट्रभक्तीचा संकल्प दृढ करण्याचा दिवस आहे. शिवभक्तांनी हा सोहळा दिमाखात साजरा करताना सर्वधर्म समभाव ही संकल्पना आचरणात आणून राष्ट्रीय एकात्मता जपणे आणि बंधुभाव वाढवणे म्हणजेच महाराजांच्या विचारांचे आचरण जीवनात उतरवणे हीच खरी आदरांजली ठरते.

शिवजयंती साजरी करताना प्रथम महाराजांच्या प्रतिमेला अभिवादन करून त्यांच्या कार्याचा आढावा घेणे आवश्यक आहे. शिवचरित्र वाचन, व्याख्यानमाला आणि ऐतिहासिक प्रसंगांचे सादरीकरण यांमधून युवकांना स्वराज्याची प्रेरणा देता येईल. ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुका काढताना शिस्त, संयम आणि कायद्याचे पालन राखणे ही

(उर्वरीत पान २ वर)


शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार


नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5



चतुर्थ पुण्यस्मरण



थोर स्वातंत्र्य सेनानी

परमपूज्य स्व.साहेबराव पंढरीनाथ थोरवे (दादा)

यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणार्थ

अखंड हरिनाम सोहळा, भागवत मूलसंहिता वाचन पारायण व होम हवण

गुरूवार दि. १२ ते १९ फेब्रुवारी २०२६ पर्यंत

बुधवार दि. १८/०२/२०२६ रोजी रात्री ७.०० ते ९.००

वेदमुर्ती - यज्ञेश्वर जोशी (नांदेड) यांचे कीर्तन

गुरूवार दि. १९/०२/२०२६ रोजी सकाळी ८ ते १० शिवजयंती उत्सव सोहळा



गुरूवार दि. १९/०२/२०२६ रोजी सकाळी १० ते १२

रामायणाचार्य विदर्भरत्न

ह.भ.प.संजयजी महाराज पाचपोर (बाबा)

यांचे पुण्यतिथीचे कीर्तन होईल.

* निमंत्रक *

ॲड.हनुमंत साहेबराव थोरवे पा. (मुलगा) मो. ९०२११३१४०४

धैर्यशील हनुमंतराव थोरवे पा. (नातु) मो. ९७६६९२९६९६

समस्त थोरवे परिवार समस्त ग्रामस्थ सोलापुरवाडी, खुंटेफळ, पुंडी

स्थळ : सोलापुरवाडी, ता. आष्टी, जि.बीड

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG



संपादकीय....

# सातत्यपूर्ण पाठबळ हवे

आयटी क्षेत्रासाठी यंदाचा अर्थसंकल्प सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण ठरतो. कर सुलभीकरण, डिजिटल पायाभूत सुविधांवरील भर, एआय आणि नवोन्मेषाला चालना यामुळे हे क्षेत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनामध्ये आणखी महत्त्वाची भूमिका बजावेल.

भारतात आयटी क्षेत्राचा विस्तार वेगाने झाला. भारतातील या क्षेत्राची गेल्या पंचवीस वर्षांमधली प्रगती जुन्या–जाणत्यांनाही चकीत करणारी आहे. या क्षेत्राने दिलेल्या संधींचा फायदा घेत भारतीय तरुणाईने यशाची नवी शिखरे सर केलीच, पण समृद्धीही मिळवली. आज हे भारताच्या प्रगतीच्या प्रवासातले महत्त्वाचे क्षेत्र ठरते आहे. देशाच्या अर्थकारणात या क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे. कोणतेही उत्पादन न देता सेवेच्या बळावर हे क्षेत्र प्रगती करत आहे. अर्थात हार्डवेअर क्षेत्राचाही या ना त्या प्रकारे संबंध येत असल्याने एकूणच आयटी आणि संगणक क्षेत्र देशात हातात हात घालून प्रगती करत आहेत. त्यामुळेच या क्षेत्रातील घडामोडी, बदलत्या सरकारी तरतुदी, अमेरिकेसारख्या भल्या मोठ्या देशाचा या क्षेत्राच्या अर्थकारणात असणारा सहभाग महत्वाचा ठरतो. किंबहुना, अमेरिकेत सर्दी झाली तरी भारतात हुडहुडी भरते, असा प्रकार अनुभवायला मिळतो. असे अनेक घटक तपासत, समजून घेत आणि त्यांचा प्रभाव अनुभवत भारत या क्षेत्रातील वाटचाल सूकर करत असतो. गेले काही दिवस अमेरिका आणि भारताचे सातत्याने बदलत, वर–खाली होत असलेले संबंध आयटी क्षेत्रात तरंग उमटवत आहेत. कदाचित म्हणूनच व्हिसा किंवा नागरिकत्व देण्याच्या अमेरिकेच्या धोरणाबरोबरच भारतातील आर्थिक धुरीण या क्षेत्राच्या प्रगतीकडे कसे बघतात, त्याच्या समोर असलेल्या आव्हानांचा मागोवा कसा घेतात हे बघणे महत्वाचे ठरते. अमेरिकेत डोनाल्ड ट्रंप अध्यक्षपदी विराजमान झाल्यापासून हे क्षेत्र काही विक्षिप्त निर्णयांना आणि तरतुदींना सामोरे जात आहेच, पण सातत्यपूर्ण बदलही अनुभवत आहे. त्याचेच प्रतिबिंब ताज्या अर्थसंकल्पामध्ये पहायला मिळाले.

केंद्रीय अर्थसंकल्प भारताच्या आर्थिक धोरणाचे प्रतीक असतो. माहिती तंत्रज्ञान अर्थात आयटी क्षेत्र हे भारताच्या जीडीपीमध्ये मोठे योगदान देणारे क्षेत्र असल्याने आयटीशी संबंधितांच्या अर्थमंत्र्यांकडून नेहमीच मोठ्या अपेक्षा असतात. भारताची अर्थव्यवस्था वेगाने बदलत असताना माहिती तंत्रज्ञान म्हणजेच आयटी क्षेत्र त्या बदलाचे प्रमुख इंजिन ठरले आहे. १९९०च्या दशकात सुरू झालेला संगणकीकरणाचा प्रवास आज कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड कम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, डेटा नॅलिटिक्स आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांपर्यंत पोहोचला आहे. या पार्श्वभूमीवर २०२६–२७ साठी सादर करण्यात आलेले केंद्रीय अंदाजपत्रक आयटी क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात डॉ. मनोज मोठे यांचा सत्कार

लातूर ।प्रतिनिधी

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर येथील सीईटी सेलचे समन्वयक तथा देशिकेंद्र विद्यालय लातूरचे विज्ञान विषयाचे सहशिक्षक डॉ. मनोज सुभाषराव मोठे यांना शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल नुकताच लोकमत लातूर गौरव पुरस्कार दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी सौ. वर्षा ठाकूर–घुगे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



त्याबद्दल महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील प्राचार्य कक्षामध्ये त्यांचा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे यांच्या हस्ते शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कररेड्डी, पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, प्रो. डॉ. दिनेश मौने, प्रो. डॉ. संजय गवई, डॉ. विजयकुमार सोनी, प्रो. डॉ. दीपक चाटे, डॉ. मनोहर चपळे, डॉ. गुणवंत बिरादार, प्रा. केशव बिराजदार, प्रा. केशव सूर्यवंशी, प्रा. उदयकुमार धनुरे यांची उपस्थिती होती.

यावेळी शुभेच्छापर मनोगत व्यक्त करताना प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे म्हणाले की, डॉ. मनोज सुभाषराव मोठे यांनी शिक्षण क्षेत्रात त्यांचे कर्तुत्व आणि निष्ठा जपत समाजात एक वेगळी ओळख निर्माण केली. महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था आणि देशी केंद्र विद्यालय लातूरचा नावलौकिक केला. आपल्या कार्याची ही प्रेरणा समाजातील इतरांना नवी ऊर्जा व योग्य दिशा मिळेल असेही ते म्हणाले.

त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सन्माननीय संस्था पदाधिकारी, सर्व युनिटचे प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे जेईई मेन्स परीक्षेत उज्ज्वल यश

लातूर ।प्रतिनिधी

महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर व्दारा संचलित महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थी ठाकूर दत्ता दिगंबरसिंग (९५.०७ पर्सेंटाइल), दीक्षित वारद वसंत (८९.५१ पर्सेंटाइल), शिंदे वेदांत वसंत (८८.४६ पर्सेंटाइल) आणि जाजे वैष्णवी शिवकुमार (८१.४७ पर्सेंटाइल) यांनी जेईई मेन्स (पहिले सत्र) परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केले आहे.हे सर्व विद्यार्थी सर्वसामान्य कुटुंबातील आहेत. आमच्या महाविद्यालयात घेण्यात आलेल्या नियमित तासिका, नियमित सराव परीक्षा आणि त्यातील अडचणी व उपाय योजना, संस्था पदाधिकारी, आई–वडील, प्रभारी प्राचार्य, मुख्य समन्वयक, पर्यवेक्षक, सीईटी सेल मुख्य समन्वयक, बोर्ड समन्वयक आणि विज्ञान शाखेचे सर्व शिक्षक यांच्या मार्गदर्शनामूळे हे उज्ज्वल यश प्राप्त झाले आहे अशा भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या आहेत. त्यांनी मिळविलेल्या या उज्ज्वल यशाबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे आणि इतर सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ. भास्कर रेड्डी नल्ला, पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, सीईटी मुख्य समन्वयक प्रा. वनिता पाटील, बोर्ड समन्वयक डॉ. गुणवंत बिरादार, स्टाफ सचिव, विभाग प्रमुख, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## रत्नसुंदर अर्बन को ऑप क्रेडीट सोसायटी ली माजलगाव

**नमुना झेड**

**स्थावर मिळकतीची ताबा घेण्याबाबतची जाहीर सूचना**

**(महाराष्ट्र सहकरी संस्था कायदा १९६० चे नियम १०७ व त्याचे पोटनियम अन्वये )**

ज्याअर्थी रत्नसुंदर अर्बन को ऑप क्रेडीट सोसायटी ली माजलगाव शाखा: माजलगाव याचे खालील नमूद कर्जदार त्याचे जमीनदार तथा सहकर्जदार तसेच गहाणदार यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड न केल्यामुळे त्याचे व त्याचे जमीनदारा विरुद्ध महा.सह. संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड, याचेकडून थकीत कर्जाच्या वसुलीसाठी वसुली प्रमाणपत्र प्राप्त केले असून त्याअर्थी मे. कोर्ट याचेमार्फत प्राप्त वसुली प्रमाणपत्राची अमलबजावणी हि महा. सह. संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) (२) आणि महा. सह. संस्था चे १९६१ चे नियम १०७ व त्या खालील उपनियम अन्वये करिता असताना खालील सही करणार श्री. अजिक्य विजयराव मगर वसुली अधिकारी, रत्नसुंदर अर्बन का ऑप क्रेडीट सोसायटी ली माजलगाव यांनी थकबाकी मागणीची नोटीस खालील नमूद दिनाकास देउन सदरचे नोटीसिमध्ये नमूद केलेली मागणी रक्कम सदर नोटीस देण्यात तारखेपासून भरणा करण्यासं कळविले होते आणि कर्जदार व तथा सहकर्जदार याच्या याच्या खालील नमूद तारखेस स्थावर मालमत्ता जप्तीचा आदेश दिला असून सदर जप्ती आदेशान्वये पुढे नीर्दीष्ट केलेली स्थावर मालमत्ता जप्त करण्यात आलेली आहे.

उपरोक्त नोटीसप्रमाने मागणी केलेली संपूर्ण रक्कम मुदतीत भरण्यास प्रतिवादी कर्जदार व त्याचे सहकर्जदार यांनी रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे व असमर्थ ठरल्यामुळे प्रतिवादी कर्जदार तथा सहकर्जदार गहणदार व मालमत्ता धारक यांना या प्रमाणे जाहीर नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना खाली निर्दीष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा खालील सही करणार विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी त्यांना प्राप्त व महा. सह.संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व १९६१ चे नियम १०७ (११(ड) १) अन्वये दिलेल्या अधिकारान्वये स्थावर मालमत्ता खालील परिशिष्टात नमूद जप्त केलेल्या मिळकतीचा सांकेतिक ताबा खालील नमूद दिनाकास घेतला आहे. सबब विशेषत: प्रतीवादी कर्जदार तथा जमिदार गहाणदार व मालमता धारक व तमाम जनतेस या द्वारे सावध करण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोन्हीही खरेदी, विक्री, गहाणखत, दान पत्र, बक्षीसपत्र, कुलमुखत्यार पत्र, साठेखत तसेच इतर कसल्याही प्रकारचा व्यवहार करू नये. याउपर कोन्हीही सदरील मिळकती बाबत व्यवहार केल्यास तो व्यवहार रत्नसुंदर अर्बन का ऑप क्रेडीट सोसायटी ली माजलगाव याच्या खालील नमूद यादीतील रक्कम आणि त्यावरील व्याज कायदेशीर शुल्क, तसेच शासकीय अधिभार खर्च इत्यादी सर्व खर्चाना अधीन राहावे लागेल याची नोद घ्यावी.

| अ.क्र. | थकीत कर्जदार सहकर्जदार गहाणदार व मालमत्ता धारक | पुनर्प्राप्ती प्रमाणपत्र क्र. | मागणी नोटीस दिनांक | स्थावर मिळकत मालमत्ता जप्ती केल्याची दिनांक | वसुलपात्र रक्कम | स्थावर मालमत्ता तपशील | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती शिंदे आशाबाई रामप्रसाद (कर्जदार) रा.चिंचोटी पो.हरिश्चंद्र पिंपरी ता.वडवणी जि.बीड | २२/५८३/ २०२५/कलम १०१/२०२५ | ४०८/२०२५ दि.०६.१०.२०२५ | वडवणी/०१/ २०२५–२६/ १५६ रोजी ०७/०७/२ | ५८३/२०२५ ८१५१०४/– दि.०७/११/ २०२५+ पासून पुढील व्याज १४ टक्के प्रमाणे | शिवाजी मौजे चिंचोली ता.वडवणी जि.बीड हद्दीतील गट नं.६३ क्षेत्रफळ ०४ हे २२ आर हिस्सामध्ये ०१ हे ४१ आर जमीन गहाणखत केलेले पुर्व–जयश्री शिंदे पश्चिम आप्पासाहेब गोंड दक्षिणेस चिंचाळा वाट उत्तरेस – गोविंद गोंडे | शिवार मौजे चिंचोटी ता.वडवणी जि.बीड हद्दीतील गट नं.६३ क्षेत्रफळ ०४ तो २२ आर. हिस्सामध्ये ०१ ओ ४१ आर जमीन गहाणखत केलेले आहे |
| २ | मोरे नवनाथ विक्रम रा.मोरेवाडी पो.कवडगांव ता.वडवणी | | | | | | |
| ३ | शिंदे निवृत्ती भारत रा.केसापुरी ता.जि.बीड | | | | | | |

सदरची जाहीर झेड नमुना नोटीस दि.१६.०२.२०२६ रोजी मी माझ्या सही व कार्यालयीन मुद्रेसह प्रसिध्दीस दिली आहे.

**दिनांक – १९.०२.२०२६**
**ठिकाण – मुख्य कार्यालय, माजलगांव**

**विशेष वसुली अधिकारी व विक्री अधिकारी**
**रत्नसुंदर अर्बन को.ऑप क्रेडीट सोसायटी लि.माजलगांव**

**तहसील कार्यालय, गेवराई ता.गेवराई जि.बीड**
**(दंड विभाग)**

## जाहिर प्रगटन

याव्दारे जाहिर प्रगटन देण्यात येते की प्रकरणात **अर्जदार सुमित्रा सिध्देश्वर डोंगरे, रा.काजळा, ता.गेवराई जि.बीड** यांनी असा अर्ज केला आहे की, त्यांचा मुलगा सागर सिध्देश्वर डोंगरे यांचा जन्म दि.१९.०३.२०१५ रोजी गेवराई येथे राहत्या घरी झालेला आहे तसेच **अर्जदाराकडुन अनावधानाने ग्रामपंचायत कार्यालय, काजळा, ता.गेवराई जि.बीड येथे नोंद घेणे राहुन गेलेले** आहे. अर्जदारास शासकीय मृत्यू नोंदीचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन सदरील मयमाचे नांव नोंद घेणे बाबत **ग्रामपंचायत कार्यालय, काजळा, ता.गेवराई जि.बीड** यांना आदेशीत करणे बाबत विनंती केली आहे.

करिता जन्माबाबत कोणाची काहीही हरकत असल्यास आपले हरकती अथवा आक्षेप १५ दिवसांचे आत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणा–या हरकती अथवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/–**
**तालूका दंडाधिकारी गेवराई**

## जाहीर प्रकटन
## (प्लॉट खरेदी संदर्भात कायदेशीर सूचना)

सर्व संबंधित नागरिक, कर्जदार, वारस, हक्कदार व जनतेस जाहीर सूचना देण्यात येते की, मौजे अंबड, ता. अंबड जि. जालना येथील सर्वे नं. ८० मधील प्लॉट नं. २, भाग नं. (७), नगरपरिषद मिळकत नं. १८–१०३–२/१, क्षेत्रफळ ८७५ चौ.फूट (८१.३१ चौ.मी.) हा प्लॉट श्री. राधाकिसन आण्णा जहाड यांच्याकडून श्रीमती अनिता उत्तम माने यांनी खरेदी करण्याचा करार केलेला आहे.

सदर प्लॉटबाबत कोणासही कर्ज, तारण, बोजा, दावा, हरकत, वाद, वारसाहक्क, कब्जा, न्यायालयीन प्रकरण किंवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात मूळ कागदपत्रांसह हरकत सादर करावी.

निर्धारित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास सदर प्लॉटबाबत कोणताही दावा नसल्याचे गृहित धरून खरेदी व्यवहार अंतिम करण्यात येईल.

**सूचना देणारे**
**खरेदीदार अनिता उत्तम माने**
**रा. अंबड, ता. अंबड, जि. जालना**
**मो.नं.–७४९९७९०५८४**

### पान १ वरून...

**केंद्रीय मंत्र्याला...**

रोहित पवार यांनी केंद्रीय नागरी उड्डयन मंत्रींना पदावरून हटवावे, आणि या प्रकरणात CBI आणि आंतरराष्ट्रीय विमान तपास यंत्रणांचा समावेश करावा अशी मागणी केली.

FIR, DGCA आणि मंत्रीजवळील संदेह

त्यांनी FIR नोंदणी, DGCA अधिकाऱ्यांवर कारवाई, आणि संबंधित मंत्री व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नाते तपासले जावे अशी पुनर्लेखी मागणी उपस्थित केली.

VSR विमानांचे सर्व विमाने थांबवावीत

त्यांनी VSR Ventures च्या सर्व विमानांचे तात्काळ सर्वीपवळपस करण्याची मागणी केली, कारण कंपनीच्या सुरक्षिततेविषयी गंभीर प्रश्न उभे ठेवले आहेत.

राजकीय आणि सामाजिक प्रभाव

या पत्रकार परिषदेत रोहित पवारांनी पत्रकारांना निर्देश देत सांगितले की केवळ अफवा नकोत, तर तथ्ये शोधली पाहिजेत. त्यांच्या शंकांनी राजकीय व सार्वजनिक चळवळींना गती दिली आहे आणि नवनिर्मितीचा प्रश्न उभा केला आहे.

रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेतील घोषणा साध्या अपघाताविरुद्ध भयाणक आरोप, तपासविरोधी गंभीर शंका आणि केंद्रीय तपासाची मागणी म्हणून मांडल्या. तपासाच्या पुढील टप्प्यावर आता प्रकरण आणखी राजकीय आणि न्यायिक रूपात पुढे जाईल का ? सरकार या प्रकरणात खरंच वास्तव समोर आणेल का ? का अजितदादांचा मृत्यू हा कायम एक रहस्यमय गुड राहील.

**घरकुल योजनेची ....**

घर पत्र्याचे असून सुमारे २१७ चौरस फुट बांधकामासाठी सहा कॉलम उभारण्यात आले आहेत. पत्र्याच्या घरासाठी स्लॅबसाठी लागणारे कॉलम उभारण्याची गरज काय, असा सवाल डॉ. ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

घरकुल मंजुरीपासून हप्ते खात्यावर पडण्यापर्यंत चिरीमिरी द्यावी लागते. शासनाकडून मंजूर ५ ब्रास वाळू प्रत्यक्षात मिळत नाही. हातात सव्वा लाख रुपये उरतात, त्यातून घर कसे बांधायचे ? असा सवाल ग्रामस्थ करत असताना डेमो हाऊससाठी १० लाखांचा खर्च म्हणजे घरकुल योजनेची क्रूर थट्टा असल्याची संतप्त प्रतिक्रिया डॉ. ढवळे यांनी दिली आहे.

**परळी रेल्वे विकास ....**

या रेल्वे जंक्शनवरून मोठ्या प्रमाणात प्रवासी प्रवास करतात, मात्र अपेक्षित सुविधा आणि थेट रेल्वे गाड्यांचा अभाव असल्याचे समितीने नमूद केले आहे.नव्या गाड्या सुरू करण्याची मागणी समितीने पुढील गाड्या तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे परळी वैजनाथ पुणे मुंबई एक्सप्रेस रामेश्वर ओखा द्वारका तीर्थयात्रा मार्गावरील 'ज्योतिर्लिंग एक्सप्रेस', जी श्रीशैलम परळी वैजनाथ औंढा नागनाथ घृष्णेश्वर – त्र्यंबकेश्वर सोमनाथ ओखा अशा मार्गे धावावी. परळी वैजनाथ नाशिक रोड दररोज नवी रेल्वे सेवा सुरू करावी, जेणेकरून वैद्यनाथ, औंढा नागनाथ, त्र्यंबकेश्वर या ज्योतिर्लिंगांना भाविकांना सोयीस्कर प्रवास करता येईल. प्रस्तावित सिकंदराबाद विकाराबाद परळी परभणी पूर्णा अकोला भोपाळ बीना मार्गावरील रेल्वे सुरू करावी. प्रवासी सुविधा वाढवण्याची मागणी परळी रेल्वे स्थानकावर प्रवाशांसाठी स्वतंत्र माहिती व पर्यटन केंद्र सुरू करावे. तसेच पाणी, जागा, वोज आणि मनुष्यबळ मुबलक प्रमाणात उपलब्ध

### पान १ वरून...

असल्यामुळे येथे 'पिट लाईन' मंजूर करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. समितीचे माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले असून, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि भाविक–प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वे प्रशासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. यावेळी समितीचे प्रमुख सदस्य सत्यनारायण दुबे, कैलास तांदळे, आर. जी. स्वामी, ज्ञानोबा आघाव, शेख हबीब हे उपस्थीत होते. परळीकरांच्या दृष्टीने या मागण्या महत्त्वाच्या ठरत असून, रेल्वे प्रशासन काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**शिवजयंती म्हणजे उत्सव .....**

प्रत्येक शिवभक्ताची जबाबदारी आहे.

उत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड देणे ही काळाची गरज आहे. रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, गरजूंना अन्न व वस्त्रदान अशा उपक्रमांद्वारे समाजसेवेचा संदेश देणे काळाची गरज बनली आहे. महाराजांनी स्त्रीसन्मान आणि सर्वधर्मसमभाव यांना दिलेले महत्त्व लक्षात घेऊन समाजात एकात्मता व बंधुभाव वाढवणे हेही तितकेच आवश्यक आहे.आधुनिक काळात सोशल मीडियाच्या माध्यमातून शिवरायांचे विचार तरुणांपर्यंत पोहोचवता येतील. मात्र, अफवा किंवा आक्षेपार्ह मजकूर टाळून सकारात्मक आणि प्रेरणादायी संदेश प्रसारित करणे गरजेचे आहे.शिवजयंतीचा उत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करणेही महत्त्वाचे आहे. ध्वनीप्रदूषण टाळणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि स्वच्छता राखणे याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे.शिवरायांचा आदर्श कृतीतून जपा हा संदेश प्रत्येक शिवभक्ताने मनाशी बाळगला, तर शिवजयंतीचा खरा अर्थ साकार होईल. उत्साह, शिस्त आणि समाजहिताचा संकल्प यांची सांगड घालत साजरी केलेली शिवजयंतीच महाराजांना खरी मानवंदना ठरेल.

जातीय द्वेषाला मूठ माती द्या..?

मनुष्य ही एकच जात आहे आणि मानवता हाच एकमेव धर्म आहे. याची शिकवण खऱ्या अर्थाने महाराजांनी आपल्या कार्यकर्तुत्वातून सिद्ध केलेली आहे. आज त्यांचाच आदर्श समोर ठेवून शिवजयंती निमित्त बीड जिल्ह्यात वाढत असलेल्या जातीय द्वेषाला मूठ माती देऊन आपण सर्व एक आहोत आणि नेक आहोत हेच आपल्या वर्तवणुकीतून सिद्ध केले तर खऱ्या अर्थाने शिवरायांचे विचार अमलात आणून त्यांची जयंती खऱ्या अर्थाने साजरी झाली असे म्हणता येईल.

**अफूचे शेतीवर....**

बीड, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि/महेश विघ्ने, पोलीस हवालदार दिलीप गिते, महेश जोगदंड दिपक खांडेकर, भागवत शेलार, विकास राठोड, गणेश मराडे व पोलीस ठाणे युसुफवडगांव येथील सहा. पोलीस उपनिरीक्षक शेंडगे, पोलीस उपनिरीक्षक मांजरे, डोंगरे यांनी मिळुन केली आहे.तरी सर्व जनतेस बीड जिल्हा पोलीस दलाचे वतीने आवाहन करण्यात येते की, पोलीस अधिक्षक कार्यालय बीड येथे अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन करण्यात आले असुन त्याचा हेल्पलाईन नं ९२७०२४३२०० असा आहे, आपणास अंमली पदार्थ खरेदी, विक्री, उत्पादन, साठवणुक, वाहतुक बाबत काहीएक माहीती मिळाल्यास वरील क्रमांकावर किंवा सपोनि/रत्नाकर घोळवे (छ्उझड कक्ष प्रमुख) मो.क्र ८८८८८२४१०० यावर कळविण्यात यावे, आपले नांव गुप्त ठेवण्यात येईल.

# कै.ड.पद्माकर हसेगावकर यांचा आज दशक्रिया विधी

बीड ।प्रतिनिधी

येथील ज्येष्ठ विधीज्ञ अँड प्रभाकर भगवानराव हासेगावकर यांचे मंगळवार दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांचा आज गुरुवार दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी दशक्रिया विधी होणार आहे.तेरावा रविवार दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी राक्षसभुवन शनिचे ता. गेवराई, जिल्हा बीड येथे होणार आहे.तर उदकशांती (गोडजेवण): सोमवार दिनांक २३ फेब्रुवारी २०२६रोजी 'सुभग', विद्यानगर (पश्चिम), बार्शी रोड,बीड राहते घरी होणार आहे.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०७/२०२६**
**मनोज पि. रमेश चौसाळकर व इतर वि. निरंक**
**(मार्फत – अ‍ॅड. एस.एस. काळे, गेवराई)**

अर्जदार – १. मनोज पि. रमेश चौसाळकर, वय ४८ वर्षे, धंदा व्यापार, रा. खडके गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड.

२. विनोद पि. रमेश चौसाळकर, वय ४३ वर्षे, धंदा – नौकरी, रा. शेलगाव, पुणे, ता. जि. पुणे.

३. अंजिली भ्र. माधव किंबहुने, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंपरी चिंचवड, हवेली, पुणे ता.जि.पुणे.

ज्याअर्थी मयत मंगलबाई उर्फ मंगळाबाई भ्र. रमेश चौसाळकर, रा. खडके गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड दिनांक ०८/१२/२०२२ रोजी रा. वाय.सी.एम. हॉस्पीटल, पिंपरी चिंचवड, हवेली पुणे, ता.जि.पुणे येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १ ते ३ यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यानी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे.. म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत मंगलबाई उर्फ मंगळाबाई भ्र. रमेश चौसाळकर, रा. खडके गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १७/०२/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीखः– २३/०३/२०२६

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०४/२०२६**
**आसराबाई ब्र. जयराम यादव आणि इतर वि. निरंक**
**(अ‍ॅड. ए.बी. पौळ गेवराई)**

अर्जदार

१. आसराबाई भ्र. जयराम यादव, वय ७५ वर्षे, धंदा शेती, रा. कोल्हेर, ता. गेवराई जि. बीड.

२. विजयकुमार पि. जयराम यादव, वय ५७ वर्षे, धंदा शेती, रा. कोल्हेर, ता. गेवराई जि. बीड.

३. संतोष पि. जयराम यादव, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. कोल्हेर, ता. गेवराई जि. बीड.

४. अनिल पि. जयराम यादव, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. कोल्हेर, ता. गेवराई जि. बीड.

ज्याअर्थी मयत जयराम पि. आसाराम यादव, रा. कोल्हेर ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक २७/०२/२०२१ रोजी रा. कोल्हेर ता. गेवराई जि.बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत. अर्जदार क. १ ते ४ यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोपणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत जयराम पि. आसाराम यादव, रा. कोल्हेर ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १७/०२/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीखः– २३/०३/२०२६

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



# पुणे येथे उत्कृष्ट निवेदक पुरस्कार मिळाल्याबद्दल महादेव इनकर यांचा भव्य सत्कार संपन्न

बीड । प्रतिनिधी

पुणे येथे प्रदान करण्यात आलेला उत्कृष्ट निवेदक हा मानाचा पुरस्कार मिळवून आपल्या कार्याची छाप उमटविणाऱ्या महादेव इनकर यांचा शहरात उत्साहात सत्कार करण्यात आला. यावेळी नगरसेवक प्रमोद अण्णा शिंद, रवी वाघमारे,कपिल सौदा, सिद्धार्थ शिंगारे, बंडू निसर्गंध, मायकल वाघमारे, पिंटू गव्हाणे, संतोष जोगदंड, ईश्वर धनवे, केतन गायकवाड, जानू वाघमारे, दीपक कांबळे, श्याम जाधव डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन मित्रपरिवार आदी उपस्थित होते.

# तत्वशील कांबळे यांचे सासरे रानोबा गायकवाड यांचे दुःखद निधन



बीड ।प्रतिनिधी

दि १७/०२/२६ रोजी सायंकाळी ६ वाजता आजारीपणामुळे दुःखद निधन झाले. दि १८/०२/२६ अंत्यविधी अंकुश नगर समशान भूमी बीड येथे झाला.ते सामाजिक कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे यांचे सासरे होते.सेवानिवृत्त कृषी पर्यवेक्षक कृषी कार्यालय गेवराई येथे त्यांनी सेवा दिली. त्यांच्या पश्चात पत्नी ४ मुली १० नातवंडे व १ पनतु असा परिवार आहे.जलदानविधी दि १९/०२/२६ संत नामदेव नगर राहत्या घरी होणार आहे.

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१११२ दि.२८.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **रफिया शेख अजीज रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रफिया शेख अजीज | स्वतः | २०.०६.१९९० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-५५ दि.१८.०२.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **राजेश कैलास शिंदे, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | कृष्णा राजेश शिंदे | मुलगा | ०५.०२.२०२० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि- दि.१८.०२.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **रामु व्यंकट शिंदे, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | भारत रामु शिंदे | मुलगी | ०१.०१.२००६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१७३९ दि.०७.०१.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **नवनाथ रामराव शिंदे, रा.आलमगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रतिक नवनाथ शिंदे | मुलगा | ०१.०२.२०१२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१११० दि.२८.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **तहा बाबु शेख रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | तहा बाबु शेख | स्वतः | ०२.०९.२००५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८१४ दि.१५.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **आमेरा बेगम अब्दुल वहाब रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आमेरा बेगम अब्दुल वहाब | स्वतः | ०५.०७.१९९८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-११०९ दि.२८.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अल्फिया तसकीन बाबु शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अल्फिया तसकिन बाबु शेख | स्वतः | ०७.०९.२००४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८१५ दि.१५.१७.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शहा अब्दुल्ला अब्दुल वहाब, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शहा अब्दुल्ला अब्दुल वहाब | स्वतः | ०४.०७.१९९५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०५१ दि.१७.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शहाबाज शकील सय्यद रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शहाबाज शकील सय्यद | स्वतः | ०५.०७.१९९५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०५२ दि.१७.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शहाबाज शकील सय्यद रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शहाबाज शकील सय्यद | स्वतः | ०५.०६.१९९८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-११११ दि.०७.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **मोहसीन महेबुब शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मोहसीन महेबुब शेख | स्वतः | १२.०७.१९९३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८१६ दि.१३.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **सायमा बेगम अब्दुल वहाब शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सायमा बेगम अब्दुल वहाब शेख | स्वतः | २५.०१.२००२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-९४१ दि.०१.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री शेख अमरीन मुख्तार रा.पारनेर ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख अमरीन मुख्तार | स्वतः | १०.०६.१९९७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-९०१ दि.०१.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री संतोष चंद्रकांत मडके, रा.पाथरवाला बु. ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | संतोष चंद्रकांत मडके | स्वतः | ०३.०८.१९८३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०५० दि.२७.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमती रिजवाना शकील बागवान, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रिजवाना शकील बागवान | स्वतः | २०.०५.२००१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २७/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०५३ दि.१७.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री शहाबाज शकील सय्यद, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शहाबाज शकील सय्यद | स्वतः | ०१.०७.१९७२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# रयतेचा राजा, स्वराज्याचा निर्माता

## शौर्य, न्याय आणि दूरदृष्टीचा संगम असलेले छत्रपती शिवाजी महाराज

प्रतिनिधी: भारतीय इतिहासाच्या विस्तीर्ण पटावर अनेक राजे, योद्धे, साम्राज्ये उदयास आली आणि काळाच्या ओघात लयासही गेली. मात्र काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, जी केवळ इतिहासाचा भाग राहत नाहीत, तर त्या राष्ट्राच्या आत्म्याचा अविभाज्य घटक बनतात. अशाच तेजस्वी, प्रेरणादायी आणि युगप्रवर्तक महापुरुषांचे नाव म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज.

१९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर जन्मलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांनी केवळ मराठा साम्राज्य उभे केले नाही, तर त्यांनी संपूर्ण भारतीय समाजाला स्वाभिमान, स्वातंत्र्य, लोककल्याण आणि सुशासनाचा एक अद्वितीय विचार दिला. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य हे एका राजाच्या पराक्रमापुरते मर्यादित न राहता, राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेचा एक अमर अध्याय ठरले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म अशा काळात झाला, जेव्हा देशावर परकीय सत्तांचे वर्चस्व होते. मुघल साम्राज्य उत्तर भारतात बलाढ्य होते, तर दक्षिणेत आदिलशाही व निजामशाहीचा प्रभाव होता. सामान्य जनता अन्याय, जुलूम, धार्मिक दडपशाही, करांचा भार आणि असुरक्षिततेत जगत होती. समाजाच्या मनात पराभवाची भावना आणि निराशा घर करून बसली होती. अशा परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा संकल्प केला, ही घटना केवळ राजकीय नव्हे, तर सामाजिक आणि सांस्कृतिक क्रांतीची सुरुवात होती.

महाराजांच्या जीवनावर सर्वात मोठा प्रभाव त्यांच्या मातोश्री राजमाता जिजाऊ यांचा होता. जिजाऊंनी बालशिवाजींना केवळ शौर्याचे धडे दिले नाहीत, तर धर्म, नीतिमत्ता, जनतेबद्दल कर्तव्य आणि राष्ट्रप्रेम यांचे संस्कार दिले. रामायण-महाभारतातील आदर्श, संतपरंपरेतील मूल्ये आणि स्वराज्याचा ध्यास या सर्वांचा संगम छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात झाला.



लहान वयातच महाराजांनी स्वराज्य उभारणीस सुरुवात केली. तोरणा किल्ला जिंकणे ही केवळ एका किल्ल्याची लढाई नव्हती, तर स्वराज्याच्या पहिल्या पायाभरणीचा क्षण होता. त्यानंतर राजगड, सिंहगड, पुरंदर यांसारख्या दुर्गांची उभारणी व जिंकण्याची मोहीम सुरू झाली. महाराजांनी दुर्गांना स्वराज्याचा कणा बनवले. डोंगरदऱ्यांतील भौगोलिक रचना त्यांनी आपल्या युद्धनीतीत कुशलतेने वापरली.

छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर ते असामान्य रणनीतीकार होते. त्यांनी विकसित केलेली गनिमी कावा ही युद्धपद्धती आजही सैन्यशास्त्रात अभ्यासली जाते. बलाढ्य शत्रूशी थेट संघर्ष टाळून योग्य वेळी योग्य ठिकाणी प्रहार करणे, ही महाराजांची खासियत होती. अफझलखानाचा पराभव असो, शायस्तेखानावर केलेला धाडसी हल्ला असो किंवा सुरतेची मोहीम - प्रत्येक घटनेत महाराजांची धैर्यशीलता आणि बुद्धिमत्ता स्पष्ट दिसते.

महाराजांचे युद्ध हे केवळ सत्तेसाठी नव्हते. ते स्वराज्य, रयतेचे संरक्षण आणि अन्यायाविरुद्धचे आंदोलन होते. त्यांनी आपल्या सैन्यात कठोर शिस्त राखली. युद्धात स्त्रियांचा अपमान न करणे, धार्मिक स्थळांचा सन्मान राखणे आणि जनतेवर अन्याय न होऊ देणे, हे नियम त्यांनी सक्तीने पाळले. त्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे राजा म्हणून ओळखले गेले.

६ जून १६७४ रोजी रायगडावर झालेला राज्याभिषेक हा भारतीय इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा क्षण ठरला. हा अभिषेक म्हणजे हिंदवी स्वराज्याच्या स्वप्नाचे प्रत्यक्षात रूपांतर होते. महाराजांनी केवळ राज्याची स्थापना केली नाही, तर एका स्वतंत्र प्रशासनव्यवस्थेचा पाया घातला.

छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन लोककल्याणकारी होते. त्यांनी अष्टप्रधान मंडळ स्थापन करून राज्यकारभार अधिक सक्षम केला. महसूल व्यवस्था सुधारून शेतकऱ्यांना दिलासा दिला. न्यायव्यवस्था मजबूत केली. भ्रष्टाचाराला आळा घातला. सर्वधर्मसमभाव जपला. महाराजांच्या राज्यात धर्माच्या नावावर भेदभाव नव्हता, तर न्याय आणि कर्तव्य यांना सर्वोच्च स्थान होते.छत्रपती शिवाजी महाराजांनी समुद्रसत्तेचे महत्त्व ओळखून एक बलाढ्य नौदल उभारले. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग यांसारखे जलदुर्ग बांधून त्यांनी परकीय आक्रमणांना रोखले. त्या काळात नौदल उभारणीचा विचार करणे हे अत्यंत दूरदृष्टीचे पाऊल होते. म्हणूनच त्यांना भारतीय नौदलाचे जनक मानले जाते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे हा विचार त्यांनी कृतीतून सिद्ध केला. सामान्य माणसाला न्याय मिळावा, रयतेचे जीवन सुरक्षित व्हावे, महिलांचा सन्मान राखला जावा, धर्मस्थळांची पवित्रता जपली जावी, ही महाराजांची भूमिका होती. त्यामुळेच त्यांचे राज्य हे लोकांच्या मनात केवळ सत्ता नसून श्रद्धेचे केंद्र बनले.

आजच्या काळातही महाराजांचा विचार अधिक प्रासंगिक ठरतो. नेतृत्व, शिस्त, ध्येयवाद, परिश्रम, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रासाठी समर्पण हे गुण त्यांच्या जीवनातून शिकण्यासारखे आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास हा केवळ भूतकाळाचा गौरव नाही, तर तो वर्तमानाला दिशा देणारा आणि भविष्य घडवणारा दीपस्तंभ आहे.

१९ फेब्रुवारी रोजी साजरी होणारी शिवजयंती ही केवळ उत्सव नाही, तर स्वराज्याच्या विचाराचे स्मरण आहे. महाराजांचे आदर्श आत्मसात करून समाजात एकता, न्याय, शिस्त आणि राष्ट्रभक्ती वाढवणे, हीच खरी शिवजयंती ठरेल. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे नव्हे, तर संपूर्ण भारताचे प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या विचारांची ज्योत सदैव तेजस्वी राहो, हीच शिवजयंतीनिमित्त प्रार्थना.

**अशोक गुरनाळे**

अध्यक्ष: लायन्स क्लब छत्रपती संभाजीनगर

# तत्त्वनिष्ठ आणि लोकाभिमुख नेतृत्व म्हणजे स्वातंत्र्यसैनिक परमपूज्य वै.साहेबराव पंढरीनाथ थोरवे दादा..!

आष्टी -बीड जिल्ह्याच्या राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रातील एक अढळ, तत्त्वनिष्ठ आणि लोकाभिमुख नेतृत्व म्हणजे स्वातंत्र्यसैनिक परमपूज्य वै. साहेबराव पंढरीनाथ थोरवे (दादा). आष्टी तालुक्याचे पितामह, भीष्माचार्य म्हणून ज्यांचा उल्लेख आदराने केला जातो, असे दादा म्हणजे अनुभवाचे चालते-बोलते विद्यापीठच होते. स्वातंत्र्यपूर्व काळातील संघर्षमय जीवन आणि स्वातंत्र्योत्तर काळातील जनसेवा या दोन्ही टप्प्यांत त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजासाठी अर्पण केले.

जन्म, बालपण आणि जिद्दीची कहाणी...

सन १९०६ मध्ये वडील पंढरीनाथ थोरवे आणि आई यशोदाबाई थोरवे यांच्या पोटी सोलापूरवाडी (ता. आष्टी) येथे दादांचा जन्म झाला. एकूण चार भाऊ आणि चार बहिणींच्या कुटुंबात त्यांचे बालपण अत्यंत साध्या परिस्थितीत गेले. आई-वडीलांनी कधी शाळा पाहिली नव्हती; त्याचप्रमाणे दादांनाही औपचारिक शिक्षणाचा योग आला नाही. मात्र जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी स्वतःला घडवले. ग्रंथवाचनाची सवय त्यांनी स्वबळावर लावली. वयाची ११५ वर्षे पूर्ण होऊनही ते विना चष्मा वर्तमानपत्रे आणि पुस्तके वाचत असत ही त्यांच्या विलक्षण स्मरणशक्ती आणि मानसिक तंदुरुस्तीची साक्ष आहे. पहाटे पाच वाजता उठून देवपूजा, सूर्योदयापूर्वी भोजन आणि सकाळी सात वाजेपर्यंत धानोरा, कडा, आष्टी परिसरात जनतेशी संवाद-अशी त्यांची दिनचर्या तरुणांनाही लाजवेल अशी होती.

स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग..

वयाच्या १५ व्या वर्षापासून त्यांनी संघर्षाचा मार्ग स्वीकारला. सन १९३८ ते १९४८ या काळात त्यांनी हैदराबाद मुक्ती लढ्यात सक्रिय सहभाग घेतला. यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांसारख्या थोर नेत्यांचा त्यांना सहवास लाभला. निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्ध त्यांनी सत्याग्रह, झेंडा सत्याग्रह, वंदे मातरम् आंदोलन, जंगल सत्याग्रह अशा अनेक चळवळींमध्ये सहभाग घेतला. हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या मुक्ती आंदोलनात त्यांनी सीमाभागात शिबिरे उभारून चळवळीला वेग दिला.

राजकीय कारकीर्द...

सन १९६२ मध्ये जिल्हा परिषद अस्तित्वात आल्यानंतर पहिल्या निवडणुकीत त्यांनी कम्युनिस्ट पक्षाकडून निवडणूक लढवली. सन १९६७ मध्ये काँग्रेसच्या तिकिटावर



स्व.साहेबराव थोरवे (दादा)
मृत्यु दि.०४/०३/२०२२

ते जिल्हा परिषद सदस्य झाले आणि सलग ११ वर्षे या पदावर कार्यरत राहिले. त्याच काळात ते आष्टी पंचायत समितीचे सलग ११ वर्षे सभापती होते. सन १९७७ मध्ये कडा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन म्हणून त्यांनी सूत्रे हाती घेतली आणि सलग आठ वर्षे कारखान्याच्या विकासाला दिशा दिली. बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे १५ वर्षे संचालक म्हणून त्यांनी सहकार क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. सहकार, पंचायत राज आणि शिक्षण या तिन्ही क्षेत्रात त्यांनी भरीव कामगिरी बजावली.

विकासकामांचा ध्यास...

आष्टी तालुक्यातील दळणवळण सुधारण्यासाठी अनेक रस्त्यांची उभारणी त्यांच्या काळात झाली. पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्यासाठी नदी-नाल्यांवर बंधारे, तलाव उभारले. शेतकऱ्यांना विहिरीसाठी निधी उपलब्ध करून दिला. गोरगरिबांना निवारा मिळावा म्हणून शासकीय योजनांतून पत्र्यांचे वाटप केले. दुष्काळी भागात पाणी आणि रोजगाराची सोय करून जनतेच्या जीवनमानात त्यांनी बदल घडवला.

शिक्षणप्रेमी नेतृत्व...

शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे या विचारावर त्यांचा ठाम विश्वास होता. स्वतःला शिक्षणाचा लाभ न मिळाल्याची खंत त्यांनी समाजसेवेच्या माध्यमातून भरून काढली. खुंटेफळ येथे लोकमान्य शिक्षण संस्था आणि लोकमान्य वसतिगृह सुरू करून हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी दिली. विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय व्हावी म्हणून लोकांकडून धान्य गोळा करून वसतिगृह चालवणे ही त्यांची अद्वितीय कामगिरी होती.

धार्मिक आणि सामाजिक कार्य...

दादांना लहानपणापासून वारकरी संप्रदायाची ओढ होती. ते नित्यनेमाने पंढरपूर वारी करीत. भजन, कीर्तन, हरिनाम सप्ताह, महापंगती यामध्ये ते अग्रस्थानी असत. अनेक संत-महंतांना मठ उभारण्यासाठी त्यांनी आर्थिक मदत केली. दुष्काळी काळात कीर्तनाच्या माध्यमातून लोकांना मानसिक आधार दिला.

तत्त्वनिष्ठ आणि शब्दाला जागणारे व्यक्तिमत्व...

दादांचे वैशिष्ट्य म्हणजे शब्द पाळणे. त्यांनी दिलेला शब्द कधी बदलला नाही. प्रेम, माया यापेक्षा दिलेले वचन श्रेष्ठ असते, असा त्यांचा ठाम विश्वास होता. उतारवयातही त्यांनी दिलेले राजकीय आणि सामाजिक शब्द पूर्ण केले. घरी आलेल्यांना भोजन घातल्याशिवाय पाठवू नये, अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान ही त्यांची जीवनशैली होती.


अखेरचा वारसा...

स्वातंत्र्यपूर्व ५० वर्षे आणि स्वातंत्र्योत्तर ५० वर्षे असे शतकभराचे जीवन त्यांनी चंदनासारखे झिजवले. आष्टी तालुक्याच्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक उभारणीत त्यांचे योगदान अमूल्य आहे. आज त्यांचा वारसा त्यांचे चिरंजीव श्री. ॲड. हनुमंत थोरवे साहेब आणि नातू श्री. धैर्यशील थोरवे पुढे नेत आहेत. परमपूज्य वै. साहेबराव थोरवे दादा म्हणजे हिमालयाएवढे उंच व्यक्तिमत्व, त्याग, निष्ठा आणि जनसेवेचे जिवंत प्रतीक. त्यांच्या आठवणी आजही आष्टी तालुक्याच्या जनमानसात प्रेरणेचा दीप प्रज्वलित ठेवतात. त्यांच्या कार्याचा सुवास पुढील अनेक पिढ्यांना मार्गदर्शक ठरत राहील, यात शंका नाही.

शब्दांकन...

**राजेंद्र लाड (आष्टी)**

९४२३१७०८८५




हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# जि प शाळा हरीलाल नाईक तांडाच्या व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी छगन राठोड

गेवराई ।प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हरिलाल नाईक तांडा गेवराई या शाळेच्या व्यवस्थापन समितीचे गठन करण्यात आले असून, अध्यक्षपदी छगन मोतीराम राठोड तर सचिवपदी मुख्याध्यापक भडके सर, उपाध्यक्षपदी नवनाथ दिना चव्हाण यांची सर्वांमध्ये बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

गेवराई तालुक्यातील हरीलाल नाईक तांडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीचे दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी गठन करण्यात आले आहे. या समितीच्या अध्यक्षपदी छगन मोतीराम राठोड, सचिवपदी शाळेचे मुख्याध्यापक फडके सर तर उपाध्यक्षपदी नवनाथ दिना चव्हाण यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या पुढील काळात



शाळा सुंदर व सुसज्ज करण्यासोबतच येथील विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे अध्यक्ष छगन राठोड आणि उपाध्यक्ष नवनाथ चव्हाण यांनी सांगितले. याप्रसंगी कैलास राठोड, रघुनाथ राठोड, जीवन राठोड, ज्ञानेश्वर राठोड, रमेश राठोड, विकास राठोड, ग्रामपंचायत सदस्य दत्ता राठोड, संतोष चव्हाण यांच्यासह शाळेतील पवार सर, काळे सर, सपाटे सर, घोडके सर, कुलगुडे सर, श्रीमती देवडे मॅडम, श्रीमती नदाडे मॅडम, अंगणवाडी सेविका संगीता राठोड, मीरा चव्हाण, मीरा विजय राठोड यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व महिलावर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र सोमेश्वर हनुमान महादेव मंदिरातील अखंड हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील सर्वांच्या नवसाला पावणारे असे श्री सोमेश्वर हनुमान मंदिर या ठिकाणी प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी अतिशय मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तीमय वातावरणामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता झाली.श्री सोमेश्वर हनुमान मंदिर येथे ९ फेब्रुवारी रोजी अखंड हरिनाम सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे पाच वाजता काकडा, हरिपाठ, गाथा भजन, श्री विष्णू सहस्त्रनाम, श्री भावार्थरामायण अशा विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन या ठिकाणी धार्मिक उपक्रमांनी संपन्न झाले. तर प्रवचन सायंकाळी महाराष्ट्रातील नामांकित असणाऱ्या गुन्हिजन हरिभक्त परायण महाराजांचे हरिकीर्तन या ठिकाणी झाले. या



सप्ताहाची सांगता सोमवारी मोठ्या उत्साहामध्ये भगवान श्री सोमेश्वर महादेवाची महापूजा रुद्राभिषेक संपन्न होऊन तसेच या ठिकाणी स्थापित असलेल्या सर्व देव त्यांचे पूजन होऊन मोठ्या उत्साहात या सप्ताहाची सांगता झाली. या वेळी बीड शहरातील व बीड जिल्ह्यातील हजारो भाविक भक्त या ठिकाणी महाप्रसादासाठी उपस्थित होते. श्री सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशनच्या वतीने सर्व मान्यवरांचा येथोचित सत्कार करण्यात आला. या वेळी ट्रस्टीचे अध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विश्वस्त यांनी उत्कृष्ट धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करून सर्व येणाऱ्या भाविक भक्तांची अप्रतिम व्यवस्था केली होती. यावेळी मंदिराचे विश्वस्त तथा बीड नगर परिषदेचे नगरसेवक अँड. गोविंद शिराळे पाटीलसह भाविक भक्त व श्री हनुमान मंदिर फाउंडेशनचे सर्व विश्वस्त उपस्थित होते.

आता दर सोमवारी सोमेश्वर मंदिरात अन्नछत्र - नवनाथअण्णा शिराळे

श्री सोमेश्वर मंदिर संस्थान येथील आयोजित सप्ताहामध्ये आणि महाशिवरात्र निमित्त हजारो भाविकांनी दर्शन आणि महाप्रसादाचा लाभ घेतला. भविष्यात श्री सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर संस्थान बीड येथे दर सोमवारी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी अन्नछत्र सुरू करणार असल्याचे श्री सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी जाहीर केले.

# राजनंदिनी पवार बनल्या फ्यूचर वर्सिटी एज्युकेशन ग्रुप प्रस्तुत फेमिना मिस इंडिया महाराष्ट्र २०२६ च्या विजेत्या

मुंबई ।प्रतिनिधी

फ्यूचर वर्सिटी एज्युकेशन ग्रुपतर्फे फेमिना मिस इंडिया महाराष्ट्र २०२६ स्टेट फिनालेचा भव्य सोहळा आयोजित करण्यात आला. हा संध्याकाळी सोहळा हाय-फॅशन कूट्योर ग्लॅमर, उत्कृष्ट स्टेज प्रेझेंटेशन आणि आधुनिक भारतीय एलिगन्स यांचा अप्रतिम संगम ठरला. मिस इंडिया ऑर्गनायझेशनच्या व्हिजन अंतर्गत फ्यूचर वर्सिटी एज्युकेशन ग्रुपने आयोजित केलेला हा प्रतिष्ठित कार्यक्रम मुंबईतील सुप्रसिद्ध बाल गंधर्व रंगमंदिर ऑडिटोरियममध्ये पार पडला. जिथे फॅशन, आत्मविश्वास, नवकल्पना आणि उद्देशपूर्ण आधुनिक महिला सक्षमीकरणाची झलक पाहायला मिळाली.

भारतीय उच्च शिक्षण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून फ्यूचर वर्सिटी एज्युकेशन ग्रुप (ऋन्नएऋ) ला महाराष्ट्र, गुजरात आणि हरियाणा राज्यांमध्ये फेमिना मिस इंडिया आयोजित करण्याचा अधिकृत परवाना मिळाला आहे. संपूर्ण कार्यक्रमाचे व्यवस्थापन फ्यूचर वर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी केले, ज्यामुळे त्यांना भारतातील सर्वात प्रतिष्ठित प्लॅटफॉर्मपैकी एकावर प्रत्यक्ष इंडस्ट्री अनुभव मिळाला. स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग, प्रोडक्शन, क्रिएटिव डायरेक्शन, स्टायलिंग, बॅकस्टेज मॅनेजमेंट, मीडिया हॅंडलिंग आणि ऑन-ग्राउंड एक्झिक्युशनपर्यंत विद्यार्थ्यांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. ही संकल्पना फ्यूचर वर्सिटीच्या इंडस्ट्री-इंटिग्रेटेड लर्निंग मॉडेलचे उत्तम उदाहरण आहे, जिथे शिक्षण वर्गखोल्यांपलीकडे जाऊन प्रत्यक्ष मोठ्या प्रकल्पांशी जोडले जाते.

मुंबई मुख्यालयासह दिल्ली, अहमदाबाद, जयपूर आणि दुबई येथे कार्यरत असलेला फ्यूचर वर्सिटी एज्युकेशन ग्रुप नव्या पिढीच्या उच्च शिक्षण क्षेत्रात अग्रस्थानी आहे. मुंबई विद्यापीठ, संलग्न संस्था, केंद्रीय विद्यापीठे आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक भागीदारांच्या सहकार्याने फ्यूचर वर्सिटी इंडस्ट्री-ओरिएंटेड आणि जागतिक स्तरावर उपयुक्त असे अभ्यासक्रम उपलब्ध करून देते, जे शैक्षणिक उत्कृष्टता आणि व्यावसायिक तयारी यांचा समतोल साधतात. -++ छ--उ मान्यताप्राप्त विद्यापीठ भागीदार आणि १५,००० हून अधिक यशस्वी माजी विद्यार्थ्यांसह, हा समूह एक्स्पिरिएन्शियल लर्निंग आणि इंडस्ट्री कनेक्टचे मजबूत उदाहरण बनला आहे.

फ्यूचर वर्सिटीच्या विविध विभागांतील - छ-एचऊ, छ-डच्, छ-ऋऊख, ऋ-झ-, ङ्डख, खचडठ आणि ङ्ळींत्रश्चेलरश्र - विद्यार्थी मिस इंडिया ऑर्गनायझेशन आणि द टाइम्स ग्रुप यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करतात. ही भागीदारी संस्थेच्या दूरदृष्टीची आणि पेजंटच्या इनोव्हेशन, समावेशकता आणि युवा-प्रेरित उत्कृष्टतेच्या बांधिलकीची साक्ष देते. महाराष्ट्र पर्यटनाच्या व्हिजननुसार, फ्यूचर वर्सिटी फॅशनसोबतच राज्याची समृद्ध संस्कृती आणि परंपरा यांचा प्रसार करण्यासाठी सक्रियपणे काम करत आहे.

कार्यक्रमाची सुरुवात राज्य निवड प्रक्रियेच्या प्रभावी सादरीकरणाने झाली.ज्यामध्ये मुंबई आणि पुणे येथे झालेल्या १० मोठ्या ऑडिशन्सचा समावेश होता. या ऑडिशन्समध्ये ७०० पेक्षा जास्त स्पर्धकांनी सहभाग घेतला आणि अखेरीस महाराष्ट्रातून टॉप १६ फायनलिस्टची निवड करण्यात आली, ज्या महत्त्वाकांक्षा, व्यक्तिमत्त्व आणि नव्या पिढीच्या नेतृत्वाचे प्रतीक आहेत.

स्टेजवर फायनलिस्ट इंट्रोडक्शन राउंडमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. त्यानंतर तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण रॅम्प वॉक राउंड, प्रभावी इंट्रोडक्शन राउंड आणि इंटरॅक्टिव ट- राउंड पार पडले, ज्यामध्ये सौंदर्य, बुद्धिमत्ता, आत्मविश्वास आणि स्टेज प्रेझेन्सचे उत्कृष्ट प्रदर्शन झाले.

स्पर्धकांच्या खास वैशिष्ट्यांचा सन्मान करत सब-कॅटेगरी टायटल्स जाहीर




करण्यात आले.

मिस ब्यूटीफुल स्माईल - पारिनाज कूपर मिस ग्लोइंग स्किन - समायरा शाह मिस रॅम्पवॉक - आर्या खैरनार मिस फोटोजेनिक - तमन्ना भारतमिस कॉन्जेनियलिटी - पारिनाज कूपर(छायाकार : रमाकांत मुंडे, मुंबई)

# पूर्णा नदीतील कानडी-लिंबखेडा वाळूघाटाची संयुक्त पाहणी

रॉयल्टीत ५००रुपये कपात, पण नेटवर्क अडथळ्यांवर प्रश्नचिन्ह

तळणी ।प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील तळणी परिसरातील पूर्णा नदी पात्रातील कानडी-लिंबखेडा येथील अधिकृत वाळूघाटाची (ता. १८) रोजी तहसीलदार सुमन मोरे आणि पोलीस निरीक्षक मनोजकुमार राठोड यांनी संयुक्त पाहणी केली. वाहनधारकांच्या सातत्यपूर्ण मागणीनंतर प्रशासनाने रॉयल्टी दरात प्रति ब्रास ५०० कपात करण्याचा निर्णय घेतला. संबंधित लिलावधारकाशी चर्चा करून हा निर्णय झाल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

रॉयल्टी जास्त, वाहनधारकांचा आक्षेप

घाटावरील रॉयल्टी दर अवाजवी असल्याची तक्रार वाहनधारकांनी तहसीलदारांकडे केली होती. दरकपातीमुळे काहीसा दिलासा मिळाला असला, तरी खर्चाच्या तुलनेत दर अजूनही जड आहेत, अशी कुजबुज वाहनधारकांतून ऐकू येत आहे.

जिओ-फेन्सिंग अनिवार्य; पण नेटवर्क ठप्प

वाळू उपशावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिओ-फेन्सिंग आणि 'महाखनिज' प्रणालीद्वारे ऑनलाईन देखरेख अनिवार्य करण्यात आली आहे. अधिकृत क्षेत्राबाहेर उपसा होऊ नये, हा उद्देश असला तरी प्रत्यक्षात नदीपात्रात मोबाईल नेटवर्कचा अभाव ही मोठी अडचण ठरत आहे.

ई-पास किंवा इन्व्हॉईस तयार करताना सर्व्हरशी कनेक्शन होत नसल्याने वाहतूक ठप्प होते. परिणामी घाटावर वाहनांची रांग लागते आणि तणाव निर्माण होतो.

लिलावधारकांनी 'नेटवर्क झोन'मध्ये फेन्सिंगची मर्यादा वाढवावी किंवा इन्व्हॉईस निर्मितीसाठी स्वतंत्र बफर झोन निश्चित करावा, अशी



मागणी केली आहे. यावर तहसीलदार सुमन मोरे यांनी वरिष्ठांकडे पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले.

वाहन उभे ठेवल्याने तणाव...

पाहणी दरम्यान एका वाहनचालकाने गाडी रस्त्यात उभी ठेवल्याने रॉयल्टी भरून बाहेर पडणाऱ्या वाहनांना अडथळा निर्माण झाला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी तहसीलदार आणि पोलीस निरीक्षकांना हस्तक्षेप करावा लागला. काही काळ गोंधळाची स्थिती निर्माण झाली.

अवैध उत्खनन आढळले नाही, नियमभंगास कडक कारवाई - सुमन मोरे

कानडी-लिंबखेडा वाळूघाटाची सविस्तर पाहणी केली असता कोणतेही अवैध उत्खनन आढळले नाही. मजुरांच्या साहाय्याने नियमानुसार उपसा सुरू असून प्रत्येक घाटावर महसूल ग्राम अधिकाऱ्यांचे पथक तैनात आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास लिलावधारकावर कडक कारवाई करण्यात येईल.'नेटवर्क झोन'मध्ये फेन्सिंगची मर्यादा वाढवणे किंवा इन्व्हॉईससाठी स्वतंत्र बफर झोन निश्चित करण्याबाबत वरिष्ठांकडे पाठपुरावा सुरू आहे.हा प्रश्न लवकरच मार्गी लागेल - सुमन मोरे तहसीलदार,मंठा

उस्वद-देवठाणा १ घाट बंद...

दरम्यान, तळणी परिसरातील पूर्णा नदीतील उस्वद-देवठाणा-१ येथील अधिकृत वाळूघाट स्थानिक तक्रारी व वादांमुळे काही दिवसांतच बंद ठेवावा लागल्याची माहिती आहे. त्यामुळे कानडी-लिंबखेडा घाटावरील ताण आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दरकपातीचा निर्णय तात्पुरता दिलासा देणारा ठरला असला, तरी नेटवर्क व इन्व्हॉईसच्या तांत्रिक अडचणींवर तोडगा निघाला नाही, तर घाटावरील कामकाज सुरळीत होणे कठीणच राहील, अशी स्पष्ट प्रतिक्रिया वाहनधारकांकडून व्यक्त होत आहे.

# अखेर एकाही बिअर बारला परवानगी दिली नाही - अॅड. अजित देशमुख

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात अधिकृत नोंदणी असलेली जवळपास साडेबाराशे बियर बार, बिअर शॉपी, देशी दारू आणि होलसेल दारू विक्रीची दुकाने आहेत. अशा परिस्थितीत सामाजिक स्वास्थ्य बिघडवायचे नसेल तर नवीन दारू दुकानांना परवानगी देऊ नका, अशी मागणी करण्यात आल्यानंतर आजच्या बैठकीमध्ये एकाही बिअर बार ला मंजुरी दिली नसल्याची माहिती ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ड. अजित एम. देशमुख यांनी दिली आहे.

बीड जिल्ह्यात दारू दुकानांमुळे अनेक कुटुंब उध्वस्त झाले आहेत. त्यामुळे आम्ही सातत्याने आता पर्यंतच्या सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडे नवीन बियर बार लायसन देऊ नका, म्हणून मागणी करत असतो. दारूने नुकसान होऊ नये, हा त्या पाठीमागचा हेतू असतो.प्रलंबित असलेल्या अनेक अर्जांपैकी काही अर्ज आजच्या बैठकीमध्ये निकाली निघणार होते. बीड जिल्ह्यातील वाढती बेकारी आणि गुन्हेगारी लक्षात घेता समाज हितासाठी व्यसनाधीनता कमी होणे गरजेचे आहे. त्यामुळे ही मागणी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह राज्याचे उत्पादन शुल्क आयुक्त राजेश देशमुख यांचे कडे देखील करण्यात आली होती. आजच्या बैठकीमध्ये एकाही नवीन बियर बारला परवानगी देण्यात आलेली नाही. त्यामुळे जिल्हा प्रशासनाला धन्यवाद देत सामाजिक स्वास्थ्य जपणे, ही प्रशासनाची जबाबदारी असल्याने हा निर्णय पुढेही कायम ठेवावा, असे ड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

# पुरुषोत्तमपुरी येथील रेखा मोरे यांचे अल्पशा आजाराने दुखद निधन

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील पुरूषोत्तमपुरी येथील रहिवासी असलेल्या सौ. रेखा हिरामण मोरे यांचे आज बुधवार दि. १८ रोजी सकाळी सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. निधना समय त्यांचे वय ६५ वर्षे इतके होते.



मयत सौ. रेखा हिरामण मोरे ह्या अत्यंत शांत संयमी आणि मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या. त्यांना पुरुषोत्तमपुरी गावात आक्का या नावाने ओळखले जात होते. त्यामागील काही दिवसापासून आजारी होत्या. त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (घाटी) उपचार सुरू होते. अखेर आज बुधवार दि. १८ रोजी सकाळी सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास त्यांचे निधन झाले. दुपारी २ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या पार्थिवावर पुरूषोत्तमपुरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पुरूषोत्तमपुरीसह पंचक्रोशीतील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील नेतेमंडळी, कार्यकर्ते, नागरिक, शिक्षक, डॉक्टर, वकील, इंजिनिअर, पत्रकार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे, दोन मुली, जावई, नातवंडे तसेच तीन भाऊ असा मोठा परिवार आहे.

# कागदपत्रांअभावी एकही शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहू देणार नाही - स्वप्नील गलधर

बीड ।प्रतिनिधी

जिल्ह्यातील शेतकरी आज कर्ज, निसर्गाचा फटका आणि वाढत्या खर्चामुळे पूर्णपणे पिचलेला आहे. अशा परिस्थितीत शासनामार्फत मिळणारी कर्जमाफी ही केवळ योजना नसून शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा आहे. केवळ आधार कार्डसारख्या कागदपत्रांअभावी जर एकही शेतकरी या लाभापासून वंचित राहिला, तर हा अन्याय शिवसेना सहन करणार नाही. कागदपत्रांअभावी एकही शेतकरी कर्जमाफीपासून



वंचित राहू देणार नाही असे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी सांगितले आहे.

लिंबागणेश सर्कलसह संपूर्ण बीड जिल्ह्यातील प्रत्येक गावातील शेतकरी कर्जदारांनी आपले आधार कार्ड तात्काळ संबंधित सेवा सहकारी संस्थेकडे सादर करावेत. तसेच मयत शेतकरी सभासदांच्या कुटुंबीयांना न्याय मिळालाच पाहिजे; त्यांच्या कायदेशीर वारसदारांनीही आवश्यक कागदपत्रे वेळेत जमा करावीत. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी शिवसेना ठामपणे त्यांच्या पाठीशी उभी आहे आणि गरज पडल्यास रस्त्यावर उतरूनही लढा दिला जाईल,असे स्वप्नील गलधर, जिल्हाप्रमुख, शिवसेना (बीड) यांनी सांगितले.

# आष्टीतील प्रथम घोडके यांचा नागरी सत्कार

## केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देण्याचे ध्येय ठेवावे - आ.सुरेश धस यांचे आवाहन

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी येथील प्रथम बाळासाहेब घोडके यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग (युपीएससी) अंतर्गत कृषी उपसंचालक (वर्ग-१) पदावर निवड झाल्याबद्दल शहरात भव्य नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले. या सत्कार समारंभात मार्गदर्शन करताना आमदार सुरेश धस यांनी प्रथम घोडके यांनी उपसंचालक पदावर कार्यरत राहून पुढे केंद्रीय लोकसेवा आयोग (युपीएससी) ची स्पर्धा परीक्षा देऊन जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस प्रमुख यांसारखी उच्च पदे गाठण्याचे ध्येय ठेवावे, असे प्रेरणादायी आवाहन केले.

आष्टी येथील नगरसेवक बाळासाहेब घोडके यांचे सुपुत्र प्रथम बाळासाहेब घोडके यांनी ग्रामीण पार्श्वभूमीतून अभ्यास करून पहिल्याच प्रयत्नात कृषी उपसंचालक पदावर यश संपादन केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल आयोजित नागरी सत्कार सोहळ्यात शहरातील मान्यवर, पदाधिकारी, अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमास व्यासपीठावर श्रीधरपंत सहस्त्रबुद्धे, सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, डॉ. शिवाजी राऊत, नगराध्यक्ष जिया बेग, रंगनाथ धोंडे, व्यापारी संघटनेचे संजय मेहेर, इंजिनिअर किशोर नाना हंबर्डे, संतोष शेठ मेहेर, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, तालुका कृषी अधिकारी गोरक्षनाथ तरटे, अरुण भैय्या निकाळजे, विस्तार अधिकारी मनोरंजन धस, खंडू दादा जाधव, अनिल ढोबळे, शादुल्ला बेग टाटा यांची उपस्थिती होती.

आपल्या भाषणात आ. सुरेश धस पुढे म्हणाले की, आष्टीसारख्या ग्रामीण भागातून विद्यार्थी कठोर परिश्रमाच्या बळावर यश मिळवत आहेत, ही अभिमानाची बाब आहे. आजच्या आधुनिक युगात कृत्रिम बुद्धिमत्ता चा वापर करून शेती क्षेत्रात नवनवीन संशोधन होणे अत्यंत गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी कोणते वाण वापरावे, उत्पादनवाढीसाठी




कोणते तंत्रज्ञान स्वीकारावे, यासाठी कृषी क्षेत्रात वैज्ञानिक दृष्टिकोनातून काम करण्याची आवश्यकता आहे. प्रथम घोडके यांनी कृषी उपसंचालक पदावर कार्य करताना शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिक यांना केंद्रस्थानी ठेवून काम करावे आणि त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रथम घोडके यांनी पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केले आहे. त्यांचे वय कमी असल्याने पुढील स्पर्धा परीक्षांसाठी त्यांच्याकडे भरपूर संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन जिल्हाधिकारी किंवा जिल्हा पोलीस प्रमुख यांसारखी जबाबदारीची पदे मिळविण्याचे ध्येय ठेवावे, असेही ते म्हणाले. ग्रामीण विद्यार्थ्यांनी आपल्या कष्टकरी आई-वडिलांनी पाहिलेली स्वप्ने साकार करण्यासाठी चिकाटीने प्रयत्न करावेत, असा संदेश देत आ. धस यांनी यापुढे आष्टी-मुर्शदपूर परिसरातील यशवंत, कीर्तीवंत व प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा सत्कार छत्रपती शिवाजी महाराज चौकातच करण्याचा निश्चय व्यक्त केला.यावेळी कृषी अधिकारी गोरक्षनाथ तरटे, वसुंधरा विद्यालयाचे प्रमुख मनोरंजन धस, संजय मेहेर व प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांची समायोजित भाषणे झाली. सत्कारमूर्ती प्रथम घोडके यांनी मनोगत व्यक्त करताना यशामागे आई-वडील, शिक्षक आणि मार्गदर्शक यांचे मोलाचे योगदान असल्याचे सांगून सर्वांचे आभार मानले. त्यांच्या आई-वडिलांचाही यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक बाळासाहेब तळेकर यांनी केले. यावेळी उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, नगरसेवक सुनील रेडेकर, किशोर झरेकर, भारत मुरकुटे, ज्ञानदेव राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. सत्कार सोहळ्याच्या प्रारंभी प्रथम घोडके व इतर यशस्वी विद्यार्थ्यांची अण्णाभाऊ साठे चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक दरम्यान भव्य मिरवणूक काढण्यात आली. शहरवासीयांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत प्रथम घोडके यांच्या यशाचा गौरव केला.

# हसत-खेळत परीक्षेला सामोरे जा; ताणतणाव टाळा - डॉ. संदीप हंबर्डे

आष्टी - (प्रतिनिधी) दहावीच्या विद्यार्थ्यांनी बोर्डाच्या परीक्षेची कोणतीही भीती न बाळगता आत्मविश्वासाने आणि हसत-खेळत परीक्षेला सामोरे जावे, ताणतणावाला बळी पडू नये, असे प्रतिपादन चाईल्ड स्पेशालिस्ट डॉ. संदीप हंबर्डे पाटील यांनी केले. आष्टी येथील स्वामी समर्थ विद्यामंदिर जय भवानीनगर या शाळेत दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षापूर्व मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

हा उपक्रम परिवर्तन कॉम्प्युटर्स यांच्या वतीने राबविण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना परीक्षेला सकारात्मक दृष्टीकोनातून सामोरे जाण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ. हंबर्डे पाटील म्हणाले की, परीक्षेच्या काळात योग्य आहार, पुरेशी झोप, नियमित व्यायाम आणि वेळेचे नियोजन अत्यंत महत्त्वाचे असते. वर्षभर केलेल्या अभ्यासाची उजळणी करणे आवश्यक असून शेवटच्या क्षणी घाईगडबड टाळावी.



मन शांत ठेवून आत्मविश्वासाने प्रश्नपत्रिकेला सामोरे गेल्यास यश निश्चित मिळते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमात सायबर क्राईम, मोबाईलच्या अति वापराचे दुष्परिणाम आणि सोशल मीडियामुळे होणारा मानसिक ताण यावरही सखोल मार्गदर्शन करण्यात आले. यासंदर्भात मधुकर खिल्लारे यांनी विद्यार्थ्यांना सजग राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक जी. सी. वरकड होते. त्यांनी समारोपपर भाषणात अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो व परीक्षेविषयीची भीती दूर होते, असे सांगत आयोजकांचे कौतुक केले. यावेळी ज्येष्ठ शिक्षक विठ्ठल बावसकर, नारखेडे, चापे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राची काळे हिने केले. या मार्गदर्शन कार्यक्रमास दहावीच्या विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. एकूणच, या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहण्याची प्रेरणा मिळाली असून हसत-खेळत, आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जाण्याचा संदेश देण्यात आला.

# वै.साहेबराव थोरवे दादा यांच्या पुण्यस्मरणानिमित्त

# सोलापूरवाडीत अखंड हरिनाम सप्ताह

## आज रामायणाचार्य संजयजी महाराज पाचपोर यांचे काल्याचे कीर्तन

आष्टी - (प्रतिनिधी) थोर स्वातंत्र्यसेनानी वै. साहेबराव थोरवे दादा यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त आष्टी तालुक्यातील सोलापूरवाडी येथे भव्य व भक्तीमय वातावरणात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रभक्ती, सामाजिक बांधिलकी व आध्यात्मिक विचारांचा ठसा उमटविणाऱ्या थोरवे दादांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विविध धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला आहे.

या सप्ताहात भागवत मूलसंहिता वाचन पारायण, श्रीमद्भागवत गीता पारायण, अखंड हरिनाम जप, तसेच विधिपूर्वक होम-हवन यज्ञ, मंत्रोच्चार, अभिषेक आदी धार्मिक विधी संपन्न झाले. सकाळपासून रात्रीपर्यंत अखंड भागवत व गीता पारायणाने परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. या सर्व धार्मिक विधींचे पौरोहित्य सुप्रसिद्ध वेदमूर्ती यज्ञेश्वर जोशी (नांदेड) यांनी केले. त्यांच्या विद्वत्तापूर्ण मार्गदर्शनामुळे व शास्त्रोक्त पद्धतीने पार पडलेल्या विधींमुळे सप्ताह अधिक फलदायी ठरल्याची भावना भाविकांनी व्यक्त केली.

पुण्यस्मरणानिमित्त आज गुरुवार दि. १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी १० ते १२ या वेळेत रामायणाचार्य, विदर्भरत्न ह.भ.प. संजयजी महाराज पाचपोर (बाबा) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. त्यांच्या प्रभावी व ओजस्वी कीर्तनातून धर्म, राष्ट्रप्रेम व संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले जाणार आहे. या कीर्तनासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ॲड. हनुमंत थोरवे यांनी केले आहे.

तसेच गुरुवार दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. शिवजयंतीनिमित्तही संजय महाराज पाचपोर यांचे प्रेरणादायी काल्याचे कीर्तन आयोजित करण्यात आले असून त्यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन कर्मयोगी ब्रह्मलीन दत्तात्रय महाराज सुद्रिक पाटील यांच्या आशीर्वादाने व मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. अध्यात्मिक बालसंस्कार वारकरी गुरुकुल, मुळेवाडी येथील विद्यार्थी वर्ग कीर्तनसेवेसाठी उपस्थित राहणार असून त्यांच्या सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष आध्यात्मिक अधिष्ठान लाभले आहे. स्वातंत्र्यसेनानी वै. साहेबराव थोरवे दादा यांनी आयुष्यभर राष्ट्रभक्ती, सामाजिक कार्य, साधी व संयमी जीवनशैली आणि अध्यात्मिक विचारांचा पुरस्कार केला. त्यांच्या पुण्यस्मरणाच्या निमित्ताने नव्या पिढीसमोर त्यांचा प्रेरणादायी वारसा मांडण्याचा प्रयत्न आयोजकांकडून करण्यात येत आहे. समाजात



एकात्मता, सद्भावना व संस्कार वृद्धिंगत व्हावेत हा या सप्ताहामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. या पवित्र व आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ पंचक्रोशीतील सर्व भाविक, भक्त मंडळी व नागरिकांनी कुटुंबासह उपस्थित राहून घ्यावा, असे आवाहन थोरवे परिवार व सोलापूरवाडी ग्रामस्थ यांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रम सोलापूरवाडी येथे होत असून ॲड. हनुमंत थोरवे व युवा नेते धैर्यशिल हनुमंत थोरवे यांनी याबाबत माहिती दिली.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादनासाठी

# शिवतीर्थावर उपस्थित राहा - दत्ताभाऊ काकडे यांचे आवाहन

आष्टी - (प्रतिनिधी) शिवजयंतीच्या पावन निमित्ताने हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यासाठी शिवप्रेमी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे नम्र आवाहन दत्ताभाऊ काकडे यांनी केले आहे. आष्टी शहरातील खडकत रोडवरील शिवतीर्थ येथे गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता शिवरायांच्या प्रतिमेचे दर्शन व अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्यास मराठवाडा भूषण, लोकनेते आमदार सुरेश धस यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून विविध मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमादरम्यान शिवप्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार असून



शिवरायांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे.शिवजयंती हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि अभिमानाचा दिवस मानला जातो. छत्रपती शिवरायांनी स्वराज्य स्थापनेच्या माध्यमातून शौर्य, धैर्य, न्यायनीती आणि लोककल्याणाचा आदर्श उभा केला. त्यांच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन समाजकार्य, राष्ट्रनिष्ठा आणि संघटनबळ वाढविण्याचा संदेश या निमित्ताने देण्यात येणार आहे. या पवित्र प्रसंगी सर्व शिवप्रेमींनी, नागरिकांनी, पत्रकार बांधवांनी तसेच माता-भगिनींनी शिवतीर्थ येथे उपस्थित राहून शिवरायांना अभिवादन करावे व शिवजयंती सोहळ्याची शोभा वाढवावी, अशी नम्र विनंती दत्ताभाऊ काकडे, प्रदेशाध्यक्ष, सरपंच परिषद मुंबई (महाराष्ट्र) यांनी केली आहे.

## शिवजयंतीनिमित्त जि.प.माध्यमिक शाळा,सुलेमान देवळा येथे भव्य कलाविष्कार व विविध

# कला गुणदर्शन कार्यक्रम



मान्यवरांच्या उपस्थितीत ऐतिहासिक सोहळा रंगणार

आष्टी (राजेंद्र लाड) तालुका आष्टी, जिल्हा बीड, केंद्र-अंभोरा अंतर्गत येणाऱ्या जि.प. माध्यमिक शाळा, सुलेमान देवळा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कलाविष्कार या संकल्पनेतून विविध कला गुणदर्शन कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार दिनांक २० फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजता शाळेच्या प्रांगणात हा प्रेरणादायी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देणे, इतिहासाची जाण जागवणे आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य, शौर्य व लोककल्याणकारी विचारांची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे हा या कार्यक्रमामागील मुख्य उद्देश आहे. कार्यक्रमात देशभक्तीपर गीत-नृत्य, ऐतिहासिक नाट्यप्रयोग, शिवराज्याभिषेक सोहळ्याचे देखणे सादरीकरण, वक्तृत्व, समूहगान, पारंपरिक वेशभूषा सादरीकरण अशा विविध कलाप्रकारांचा समावेश असणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन युवा नेते जयदत्त (भैय्या) धस, मा. शिक्षण सभापती बीड उद्धव (बापू) दरेकर, युवा नेते अजय धोंडे, युवा नेते यश (भैय्या) आजबे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अंकुशराव चव्हाण, राजेंद्रजी दहातोंडे, मंगेश साळवे, बाबासाहेब गोफणे, बुबासाहेब शेकडे, आजिनाथ शेकडे, परमेश्वर (काका) शेळके, सागर (शेठ) आमले, सुखदेव खाकाळ, राजाभाऊ शेळके, पै. बाळासाहेब गव्हाणे, विक्रम बांदल सर, सौ. डॉ. सुषमा शरद चव्हाण आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच रामहरी महानोर, शरद पवार, रावसाहेब खाकाळ, राजेंद्र गव्हाणे, शिवाजी शेकडे, शिवाजी ढोबळे सर, कांतीलाल पानसरे यांचीही प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

प्रमुख उपस्थितीमध्ये गटशिक्षणाधिकारी मोहनराव काकडे साहेब, सौ. सिमा टकले-काळे, मनोरंजन धस, जावेद पठाण, अशोक शिंदे, संदीप खराडे, बा. म. पवार, मुबारक शेख, संतोष आटोळे, बिभीषण कवडे, सुनिल तरटे, रामदास काळे, सतिष एकशिंगे, शिवाजी जाधव, बाळासाहेब शेंदुरकर, विलास मोरे, शेख अस्लम, रमेश भापकर, महादेव आमले आदी मान्यवरांचा समावेश आहे.

या कार्यक्रमास स्वामी विवेकानंद पतसंस्था मर्या. कडा चे अध्यक्ष मारुती पठाडे, उपाध्यक्ष अशोक लटपटे, सचिव महेशकुमार शिंदे, विठ्ठल शिंदे, रत्नाकर चव्हाण, पोपट बोराडे, हिरामण पोकळे, संजय काळे, गोरक्ष गोरे, ज्योतीराम देसाई, वैजिनाथ रायते आदी पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. पत्रकार सय्यद बबलुभाई, शहानवाज पठाण, गोरख मोरे, राजु शेख, प्रितम पवळ यांची उपस्थिती राहणार असून कार्यक्रमाचे व्यापक वृत्तांकन केले जाणार आहे.

या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे शिवराज्याभिषेक सोहळ्याचे थेट सादरीकरण, आकर्षक साऊंड सिस्टीम व भव्य स्टेज, तसेच ८ फूट उंच व १२ फूट रुंद भव्य स्क्रीनची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे उपस्थितांना ऐतिहासिक वातावरणाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दादासाहेब घोडके, भाऊसाहेब घोडके, शिवाजी खोरदे, राहुल घोडके, आजी-माजी शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी, आजी-माजी सेवा सोसायटी चेअरमन व सदस्य, प्राथमिक आरोग्य केंद्र अधिकारी-कर्मचारी, शिवप्रेमी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती तसेच समस्त ग्रामस्थ सुलेमान देवळा यांचे सहकार्य लाभत आहे. मुख्याध्यापक बी. यु. चव्हाण, सांस्कृतिक विभाग प्रमुख कुंडलिक काळे व शिक्षकवृंद यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी कार्यक्रमासाठी विशेष तयारी केली असून हा सोहळा संस्मरणीय ठरणार आहे. शाळा प्रशासनाच्या वतीने सर्व ग्रामस्थ, पालक व विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्श विचारांचे स्मरण करत स्वराज्याच्या संकल्पनेची प्रेरणा देणारा हा कार्यक्रम निश्चितच समाजमनात देशप्रेम व सामाजिक एकात्मतेची भावना दृढ करणारा ठरणार आहे.

# आजपासून मराठवाड्यातील सर्वात मोठे

# डॉ.स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन

## उपमुख्यमंत्री ना.सुनेत्राताई अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन; माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतील तिसरे वर्ष

आष्टी - (प्रतिनिधी) आधुनिक तंत्रज्ञान, नवे विचार आणि समृद्ध शेतीकडे वाटचाल या ध्येयवाक्याने प्रेरित होऊन आष्टी येथे आजपासून मराठवाड्यातील सर्वात मोठ्या डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते व आष्टी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून सलग तिसऱ्या वर्षी हे प्रदर्शन भरत असून, दि. १९ ते २३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पाच दिवस शेतकऱ्यांसाठी ही आनंदपर्वणी ठरणार आहे.

आज दि. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता या प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. सुनेत्राताई अजित पवार यांच्या शुभहस्ते होणार आहे. उद्घाटन सोहळ्यास विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात २०० पेक्षा अधिक नामांकित कंपन्या सहभागी होत असून, १०० ते १५० हून अधिक दालने उभारण्यात आली आहेत. आधुनिक शेती तंत्रज्ञान, सुधारित बियाणे व खते, सिंचन व्यवस्था, जलव्यवस्थापन, पीकपद्धतीतील बदल, सेंद्रिय शेती, पशुसंवर्धन, कृषी प्रक्रिया उद्योग तसेच




शेतीपूरक व्यवसाय याबाबत तज्ज्ञांकडून सविस्तर मार्गदर्शन दिले जाणार आहे.

दुष्काळी आष्टी मतदारसंघातील शेतकरी व नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी हे प्रदर्शन महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. मागील दोन वर्षांत लाखो नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन नव्या व्यवसाय संधींचा लाभ घेतला असून, बेरोजगार तरुणांसाठीही हे व्यासपीठ प्रेरणादायी ठरले आहे.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, माजी मंत्री धनंजय मुंडे, माजी राज्यमंत्री प्रकाश सोळंके, माजी आमदार अमरसिंह पंडित, माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्यासह विविध राजकीय, प्रशासकीय व कृषी क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच कृषी आयुक्त सुरज मांढरे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू इंद्र मणी, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

आष्टी येथील बी. फार्मसी कॉलेजमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत भीमराव धोंडे यांनी मंगळवारी (दि. १७ फेब्रुवारी) या प्रदर्शनाची माहिती दिली. शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. या प्रदर्शनाचे आयोजन छत्रपती शाहू, फुले, आंबेडकर कृषी महाविद्यालय, आष्टी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

स्वागताध्यक्ष म्हणून भीमराव धोंडे (संस्थापक अध्यक्ष, आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी) कार्यरत असून, निमंत्रक म्हणून डॉ. अजयदादा धोंडे व अभयराजे धोंडे कार्य पाहत आहेत. प्रायोजक म्हणून जिजाई मसाले, सहप्रायोजक प्रीमियम स्कूल ऑफ डिजिटल मार्केटिंग तसेच कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांचे सहकार्य लाभले आहे. कार्यक्रमाचे ठिकाण पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयासमोर, आष्टी येथे निश्चित करण्यात आले आहे.

मराठवाड्यातील शेतकरी, कृषी तज्ज्ञ, विद्यार्थी व नागरिकांसाठी हे प्रदर्शन मार्गदर्शक आणि परिवर्तनाचे व्यासपीठ ठरणार असून, मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.




आष्टी - थोर स्वातंत्र्य सेनानी वै. साहेबराव थोरवे दादा यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणा निमित्त सोलापूरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहात सुप्रसिद्ध वेदमूर्ती यज्ञेश्वर जोशी (नांदेड) यांचे किर्तन झाले. यावेळी माजी आ. साहेबराव दरेकर, राजेंद्र धोंडे, हनुमंत थोरवे, उत्तम बोडखे, युवा नेते धैर्यशिल थोरवे, के. के. काळे, अर्जुन काकडे, सरपंच संजय थोरवे आदी मान्यवर उपस्थित होते.

# आदर्श नगर जाफराबाद येथील ग्राम

# उन्नती स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

जाफराबाद /हरी भालके

शहरातील ग्राम उन्नती इंग्लिश स्कूल आदर्श नगर जाफराबाद येथील वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते .शाळेत सर्वप्रथम सरस्वती व इतर क्रांतिकारी तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ माँसाहेब,सावित्रीबाई , रमाबाई, अहिल्याबाई , महात्मा फुले, यांच्या प्रतिभा पुजन करून कार्यक्रमाची शिखर सुरुवात झाली. कार्यक्रमाचे उद्घाटक नगराध्यक्ष माननीय श्रीमती कविताताई दीपक वाकडे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. वार्षिक स्नेहसंमेलनाची सुरुवात श्री गणेशा या नृत्याने झाली यावेळी प्रमुख प्रमुख पाहुणे जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्थेच्या संचलित श्रीमती छाया पुंगे कळंबे म्हटल्या की आपल्या पाल्यांवर कोणतेही संस्कार केला पहिली ते पाचवी पर्यंतच्या वयात होत असतात या बालवयात त्यांच्यावर केलेले योग्य संस्कार हे त्यांच्या मनावर आयुष्यभर कोरलेले असतात स्टेजवर आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त श्रीमती प्रतिभा राजपूत इंगळे दौलतपुरा जिल्हा परिषद शाळेच्या




विद्यार्थीप्रिय शिक्षिका तसेच तसेच देउळगाव उगले येथील लोकप्रिय सरपंच रघुनाथ पंडित आबा तसेच पत्रकार बंधू मिरगे साहेब चेतन बायस शेख शेख अजीम नितीन राऊत राहुल गवई विनोद फदाट पांडुरंग भुतेकर निसार भाई इंडियन पब्लिक स्कूलचे प्राचार्य भिवरे सर शाळेचे संस्थापक अध्यक्ष माननीय प्रभाकर गाडे साहेब अभिषेक प्रभाकर गाडे आदिची उपस्थिती होती.प्रमुख पावणे लक्ष्मण मामा पाबळे यांची उपस्थिती होती . सर्व मान्यवराचा सत्कार करण्यात आला यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती रत्ना रमेश भिसे (हिवाळे) मॅडम यांनी शाळेतल्या प्रगतीची तसेच तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना मिळवलेले विशेष प्राधान्य गुणवत्ता बौद्धिक वाढी विषयी वार्षिक अहवालाच्या लेखा जोखा प्रस्ताविकेत सादर केला तसेच मुलांना लहानपणापासून मोबाईल ची वाईट सवय लागलेली आहे, त्याचा हातात फोन असेल तरच ते पोटभर जेवण करतात असे अनेक कारण मोबाईलच्या अतीवापरामुळे आपल्याला बघायला मिळतात त्या सवयींमुळे ना कुठे तरी थांबविले पाहिजे त्यावर वेळीच आवर घातला पाहिजे यासाठी सर्व पालकांनी आपल्या पाल्याना वेळ दिला पाहिजे त्याच्याशी आपल्या बालपणीच्या आठवणी सांगितल्या पाहिजे त्यावेळेस तुम्ही खेळणाऱ्या खेळाची माहिती त्यांना दिली पाहिजे त्याच्याशी ते खेळ खेळले पाहिजे जेणेकरून ते मोबाईल मधील गेम विसरतील आणि शारीरिक हालचाली करत व्यायाम सुद्धा करतील मोबाईल च्या व्यसनापासून दूर राहतील अभ्यासात लक्ष देतील स्पर्धा परीक्षेत यशस्वी होतील असा मोलाचा संदेश मुख्याध्यापिका श्रीमती रत्ना भिसे (हिवाळे ) मॅडम यांनी दिला. या वार्षिक स्नेह संमेलन कार्यक्रमात डोळ्याचे पारणे फेडले जातील असे विविध प्रकारच्या गीतावर सादरीकरण करण्यात आले त्यात महाराष्ट्र ची लोकप्रिय लावणी देशभक्तीपर नृत्य शेतकरी नृत्य दांडिया गरबा कोळी नृत्य पापा मेरे पापा जलवा स्वच्छतेचे महत्व पटवून सांगणारे गाडी वाला आया घरसें कचरा निकाल भीमगीत रमाई गीत ळिं राहणं संविधान वाचवा शिवाजी महाराज मल्हारी नृत्य जेजुरीला जाऊ पाणी वाचवा असा मोलाचा संदेश नृत्यातून देणारे गीत रामजीकी चाल शिक्षणाचे महत्व सांगणारे देवा मला शाळेत जायच मोबाईल चा दुष्परिणाम नाटीकेद्वारे नृत्य कव्वाली बेटी बचाव बेटी पढवो कॉमेडी डान्स, शांताबाई माझ्या बायकोने उपास धरला असा विविध विषयावर आधारित ३५ गाण्याचा समावेश वार्षिक स्नेह संमेलनात होता मोबाईल नाटिका नृत्य कॉमेडी डान्स शेतकरी नृत्य संविधान वाचवा युगत मांडली रमाई गीत ळिं राहणं बाबासाहेबाचे गीत या चिमुकल्याच्या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षक बनले, चिमुकल्याच्या सादरीकरनाने प्रेक्षकाची मने जिंकत पालकांनी ही खिसा रिकामा करत हजारो रुपयाची बक्षिसे गीतावर दिली कार्यक्रमाच्या सूत्रसंचालणाची धुरा वैशाली राऊत मॅडम व मिनाक्षी पैठणे यांनी सांभाळली कार्यक्रमांची सांगता राष्टगीताने करण्यात आली, कार्यक्रमासाठी आलेल्या प्रत्येक लहान थोराचे शाळेचे उपमुख्यध्यापक दमूता गाडेकर सरांनी आभार मानले कार्यक्रम यशस्वी रित्या शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावा यासाठी संस्थापक अध्यक्ष मा. प्रभाकर गाडे साहेब, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती रत्ना भिसे(हिवाळे) मॅडम तसेच शाळेचे सर्वच शिक्षक वृंदानी परिश्रम घेतले व दुपारी १२ वाजता सुरु झालेला कार्यक्रम सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत पालक ग्रामस्थ मित्र परिवाराच्या उपस्थितीत आनंदी उत्साही वातावरनात पार पडला.

# देगाव येथील पु.साने गुरुजी विद्यामंदिर विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

## स्वत:च्या नावासह शाळेचे नाव उज्वल करण्यासाठी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास



नायगाव /प्रतिनिधी

पुज्य साने गुरुजी विद्यामंदिर देगाव येथे मंगळवार दिनांक १७ फेब्रुवारी रोजी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा सेंडऑफ निरोप समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला असून या

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक तथा शालेय समिती अध्यक्ष रावसाहेब पाटील मोरे हे होते.तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या सहसचिव श्रीमती जयमाला पटने , तसेच शिक्षण विस्तार अधिकारी उद्धव ढगे कुंटुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विशाल भोसले मुक्रमाबाद पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक शंकर धनाजी मोरे,शाळेच्या माजी मुख्याध्यापिका सौ. गोदावरीताई इबिते, जि.प. कन्या शाळेचे मुख्याध्यापक आनंद रेनगुंटवार जयराम आंबेकर विद्यालय अर्जापुरचे मुख्याध्यापक सुभाष देगलुरकर यांची आवर्जून उपस्थिती लाभली. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून सेवानिवृत्त शिक्षक उमाकांत धुळेकर देगाव नगरीचे माजी सरपंच नामदेव चिंचलवाड,माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष प्रा. अशोक कुमनाळे,कोषाध्यक्ष गोविंद उपासे यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीमती सुनिताताई मुंगडे यांनी सुंदर व प्रभावीपणे केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण कोंडावार यांनी केले.आजपर्यंतचा शाळेचा प्रवास,शाळेच्या विकासासाठी लागलेले अनेकांचे योगदान याविषयी माहिती दिली कै.गंगाधरराव पटणे यांनी शाळेच्या लावलेल्या रोपट्याचे वटवृक्षात रुपांतर झाले असून आज पटणे साहेबांची उणीव भासत असल्याचा आवर्जून त्यांनी उल्लेख केला.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे शाळेचे माजी विद्यार्थी शंकर धनाजी मोरे (पोलीस उपनिरीक्षक,मुक्रमाबाद) यांचा शाळेतर्फे मानचिन्ह देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. एका सामान्य कुटुंबातून शिक्षण घेऊन जिद्दीच्या बळावर यश संपादन केलेल्या त्यांच्या कार्याचा गौरविण्यात आले

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उद्धव ढगे, विशाल भोसले श्रीमती जयमाला पटने , आनंद रेनगुंटवार, सुभाष देगलुरकर, उमाकांत धुळेकर प्रा.अशोक कुमनाळे तसेच सौ. गोदावरीताई इबिते यांनी विद्यार्थ्यांना परिश्रम, शिस्त, सातत्य आणि आत्मविश्वास यांचे महत्त्व पटवून दिले.मोठी स्वप्ने पाहा आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करा, असा संदेश त्यांनी दिला. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला डायस भेट देऊन कृतज्ञता व्यक्त केली. हा क्षण उपस्थितांसाठी अत्यंत भावनिक आणि संस्मरणीय ठरला.

कार्यक्रमाचा समारोप अध्यक्षीय भाषणातून रावसाहेब मोरे यांनी केला.त्यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने पुढील वाटचाल करण्याचे आवाहन केले शाळेच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचे प्रतिपादन केले.तर शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या परिसरामुळे हा समारंभ पार पडला आहे.

# जि.प. शाळा वाचविण्यासाठी अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रश्न उपस्थित करणार - आमदार.अंतापुरकर




नायगाव /प्रतिनिधी

नायगाव तालुक्यातील व राज्यातील जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिका शाळांमध्ये भौतिक सुविधांची कमतरता, शिक्षकांची अपुरी संख्या तसेच वाढत्या अशैक्षणिक कामांमुळे विद्यार्थीसंख्या घटत असून अनेक शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत. या पार्श्वभूमीवर सरकारी व मराठी माध्यमाच्या शाळा वाचविण्याचा प्रश्न येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित करणार असल्याचे आश्वासन आ जितेश अंतापुरकर यांनी दिले.

प्रा. डॉ. शंकर गड्डमवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी आ. अंतापुरकर यांची भेट घेऊन याबाबत निवेदन सादर केले. जिल्हा परिषद व इतर सरकारी शाळा बंद पडल्यास ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात येईल. त्यामुळे शाळांमध्ये आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे, रिक्त शिक्षक पदे तत्काळ भरणे तसेच शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी आ. अंतापुरकर यांनी देगलूर-बिलोली मतदारसंघात सर्व आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून पायलट प्रकल्पाच्या स्वरूपात शाळा सक्षम करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. या उपक्रमाला जनतेचा प्रतिसाद मिळाल्यास राज्यातील सर्व मराठी माध्यमाच्या सरकारी शाळांमध्ये सुविधा उपलब्ध करून देणे, सीबीएसई धर्तीचा अभ्यासक्रम लागू करणे तसेच शिक्षक भरतीसाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, याच मागण्यांचे निवेदन नांदेड जिल्ह्यातील आ हेमंत पाटील, बालाजी कल्याणकर, राजेश पवार, प्रताप पाटील चिखलीकर व श्रीजयाताई चव्हाण यांच्या कार्यालयातही देण्यात आले आहे.निवेदनावर ज्येष्ठ विचारवंत दत्ता तुमवाड, प्रा. जी. एल. सूर्यवंशी, आर. एम. मुंगल, जी. एम. पवार, गोपीनाथ ढगे, वैभव कुद्रे व बालाजी नुरुंदे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत




# भाजपा हदगाव तालुक्याच्या वतीने काँग्रेस प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांचा निषेध

तामसा /प्रतिनीधी

हदगाव येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना टिपू सुलतान ची करून त्यांना समकक्ष ठरवण्याचा जो दुर्दैवी व आक्षेपार्ह प्रकार काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी केला ते केवळ ऐतिहासिक अज्ञानच नव्हे तर महाराष्ट्राच्या अस्मितेवर थेट घाला आहे.छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना जबरदस्तीने धर्मांध राजवटीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या टीपू सुलतानशी करणं म्हणजे इतिहासाचा अपमान आहे.काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी केलेल्या या विधानाबद्दल संपूर्ण महाराष्ट्रातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. त्यांच्या विधानाबद्दल केवळ माफी नव्हे, तर काँग्रेस पक्षाने त्यांच्यावर तात्काळ कारवाई करून बडतर्फ करावं.याकरिता निषेध करण्यात आला त्याप्रसंगी भाजपा शहरमंडळ अध्यक्ष बाळा पाटील, पश्चिम मंडळाध्यक्ष सूर्यकांत हानवते, भाजपा ज्येष्ठ नेते चंद्रशेखर कदम, भटक्या विमुक्त जाती अध्यक्ष प्रकाश राठोड, मा.जिल्हा उपाध्यक्ष भारती कराळे, डॉ. दीपक नाईक,तामसा शहराध्यक्ष शिवराज वरकड,पदवीधर प्रकोष्ठ महेश मठपती, नगरसेवक प्रतिनीधी साई बाभुळकर, सचिन तांदळे, किसन कांबळे, गणेश हामरे,दिलीप बल्लाळ, आध्यात्मिक आघाडी अध्यक्ष गिरी महाराज, बापूसाहेब देशमुख,डोरले , पूर्व मंडळ सरचिटणीस अवधूत कदम, एडवोकेट नंदकुमार वाडकड , शहर मंडळ चिटणीस गोविंद कळसे, प्रदीप देशमुख यादव देशमुख, सुधाकर तावडे, शेषराव मुलगीर, विठ्ठल राव मस्के, अवधूत कोंडेकर, उत्तम एकलारे, भगवान खांजोडे,विजय डुरके व भाजपा प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.*

# मुदत संपण्याच्या तोंडावर

## नायगावातील १८ ग्रा.पं.कडून घाईघाईत दोन कोटी निधी उचल; दोषींवर कारवाई होणार प्रकरण गुलदस्त्यात राहणार ?

नायगाव /प्रतिनिधी

नायगाव तालुक्यातील प्रशासक नियुक्तीच्या तोंडावर नायगाव तालुक्यातील ग्रामपंचायत कारभारावर संशयाचे सावट निर्माण झाले आहे. तालुक्यातील मुदत संपलेल्या ६८ ग्रामपंचायतींपैकी तब्बल १८ ग्रामपंचायतींनी पंधरावा वित्त आयोगाच्या संयुक्त खात्यातील सुमारे दोन कोटी रुपयांची रक्कम अवघ्या चार ते पाच दिवसांत घाईघाईने काढल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या निधीची अचानक उचल का करण्यात आली, उचललेल्या रकमेतून प्रत्यक्ष विकासकामे झाली का आणि या व्यवहाराला कोणाचे अभय होते का, असे गंभीर प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

ग्रामविकासासाठी पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, प्रकाशयोजना आदी मूलभूत कामांसाठी पंधरावा वित्त आयोगाचा निधी सरपंच व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या संयुक्त स्वाक्षरीने चालणाऱ्या खात्यात जमा केला जातो. मात्र वर्षभर निधी न वापरता मुदत संपण्याच्या तोंडावर मोठ्या प्रमाणात रक्कम काढण्यात आल्याने तालुक्यात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. काही ग्रामपंचायतींची खाती पूर्णपणे रिकामी करण्यात आल्याचेही समोर आले आहे.

दरम्यान, प्रशासक नेमणुकीच्या पार्श्वभूमीवर पंचायत समितीकडून दि. १३ फेब्रुवारी रोजी सर्व ६८ ग्रामपंचायतींची संबंधित खाती गोठविण्यात आली असून पुढील निधी उचलण्यावर प्रतिबंध घालण्यात आला आहे. त्यामुळे काही पदाधिकारी बँकांकडे धाव घेत असले तरी निधी न मिळाल्याने संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

याउलट, सहा ग्रामपंचायतींनी खात्यावर निधी उपलब्ध असतानाही वर्षभरात एक रुपयाचीही उचल केली नाही. निधी असताना कामे का झाली नाहीत, हा प्रश्नही अनुत्तरित आहे.

वर्षभर निधीला हातच नाही.सातेगाव - १३,८४,२३४टाकळी तमा - ९,४४,२६९,पळसगाव - ८,७०,८००,चारवाडी - ७,३९,११९रूई (खुर्द) - ६,७३,१४०,तलबीड - ६,३६,१३७.

चार दिवसांत कोटींची उचल

मुदत संपण्याच्या अवघ्या चार ते पाच दिवसांत खालील ग्रामपंचायतींकडून मोठ्या प्रमाणात निधी काढण्यात आला :कहाळा खुर्द - १९,५४,२८७रुई (बु.) - १६,४४,३३१,शेळगाव छत्री - १२,९७,५३४,बरबडा - १२,०४,४००,नरसी - ११,४४,०२५बेद्री - ११,२८,६८२,इज्जतगाव - ११,०६,२८५,कुंटूर - १०,४८,७८१इकळीमाळ - ९,६२,५१५,कहाळा (बु.) - ९,३०,४५०,मांजरम - ८,३४,९००,कुष्णूर - ७,८६,४५०,कोलंबी - ६,८०,६२०,आलुवडगाव - ६,३२,५२९,टाकळी (बु.) - ६,३१,४५०,मुस्तापूर - ६,०६,०००,वंजारवाडी - ५,५९,०३८.....

नागरिकांचा संताप; चौकशीची मागणीमुदत संपण्यापूर्वी एवढ्या घाईघाईने निधी काढण्यामागील कारण काय? उचललेल्या निधीतून प्रत्यक्ष कामे झाली का? खर्चाचे लेखापरीक्षण पारदर्शकपणे होणार का? तसेच या प्रक्रियेत पंचायत समितीतील कोणत्याही अधिकाऱ्यांचे पाठबळ होते का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत.तालुक्यातील नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. चौकशी न झाल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.ग्रामविकासाच्या नावाखाली झालेल्या या मोठ्या आर्थिक हालचालीकडे प्रशासन गांभीर्याने पाहणार का आणि गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कारवाई होणार का, याकडे संपूर्ण नायगाव तालुक्याचे लक्ष लागले आहे.



मराठी पत्रकार संघाच्या अर्धापुर तालुकाध्यक्षपदी सखाराम क्षीरसागर, उपाध्यक्षपदी गंगाधर सोनटक्के यांची निवड झाल्याबद्दल शिवसेना उबाठाचे नांदेड जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या यावेळी उपसरपंच बालाजी गोदरे,दत्ता पाटील पारवे,शिवा संघटनेचे तालुकाध्यक्ष ओमप्रकाश नागलमे आदी सह धनमुद्रा अर्बन बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.

# किनवटमध्ये आद्यक्रांतीवीर वस्ताद लहुजी साळवे यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन; निर्भीड विचारांचा जागर

किनवट /प्रतिनिधी

किनवट शहरात आद्यक्रांतीवीर वस्ताद लहुजी साळवे यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी लहुजी साळवे यांच्या निर्भीड, क्रांतिकारक व समाजजागृती करणाऱ्या विचारांचा जागर करत त्यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमात वक्त्यांनी लहुजी साळवे यांनी समाजातील वंचित व शोषित घटकांसाठी केलेल्या संघर्षाची माहिती देत त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन सामाजिक एकात्मता व समता जोपासण्याचे आवाहन केले. समाजातील तरुणांनी त्यांच्या विचारांचा आदर्श ठेवून समाजहिताचे कार्य करण्याची गरजही यावेळी व्यक्त करण्यात आली.या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते मारोती मुनेश्वर, शासकीय कंत्राटदार अनवर मिर्झा व राजेश जोशी, शिवसेना शहर प्रमुख प्रशांतभाऊ कोंरडे, नगरसेवक श्रीराम नेम्मानीवार, प्रहार क्रांती दिव्यांग संघटनेचे तालुकाध्यक्ष भगवान मारपवार, मातंग समाज संघटना अध्यक्ष गंगाधर मुकनेपेल्लीवार, साई तिरमनवार, रमेश राशर्लावार, शिवसेना (उबाठा) चे नागनाथ भालेराव, काँग्रेस पक्षाचे माधव खेडेकर, रविकुमार दिसलवार, किशोर देवतळे, रवि उपरवार, उल्हास आडे, विशाल कलगोटूवार, माजी



नगरसेवक लक्ष्मीपती दोनपेल्लीवार, अशोक आरपेल्लीवार, देवन्ना कात्तेरवार, संतोष मारपवार, सुशांत राशर्लावार, चिन्ना माहूरकर, विकास मंत्रीवार, प्रफुल्ल इंगोले, आरुष माहूरकर, श्रेयश सावनपेल्लीवार, व्यंकटेश गायकवाड, महेश भालेराव, पवन माहूरकर, परमेश्वर मोकेनवार, लकी कोरलटवार, आयुष माहूरकर व अश्वित माहूरकर यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे वातावरण अत्यंत प्रेरणादायी व उत्साही होते. उपस्थितांनी लहुजी साळवे यांच्या कार्याला अभिवादन करत सामाजिक बांधिलकी जपण्याचा निर्धार व्यक्त केला.

# दिलीपराव मुळे यांचे निधन

अर्धापुर /प्रतिनिधी

अर्धापूर ता १८ नांदेड शहरातील सह्याद्री नगरातील ज्येष्ठ नागरिक दिलीप रामचंद्र मुळे अर्धापूरकर (वय ७३) यांचे बुधवारी (ता १८) दुपारी दिर्ध आजाराने निधन झाले.त्यांची अंत्ययात्रा गुरुवारी (ता १९) सकाळी आठ वाजता राहत्या घरापासून निघून गोवर्धन घाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.त्यांच्या मागे पत्नी, तीन भाऊ एक बहीण असा मोठा परिवार आहे.ते सेवा निवृत्त शिक्षक मधुकर मुळे यांचे कनिष्ठ बंधू होत.



# कंधार येथे पाणी टंचाई आढावा बैठक आ.चिखलीकर यांच्या उपस्थितीत संपन्न

## सरपंचांचे तसेच नागरिकांचे मागण्या ऐकून संबंधित अधिकाऱ्यांना उपाययोजना करण्याचे आदेश

कंधार (प्रतिनिधी)

कंधार येथील पाणीटंचाई आढावा बैठक लोहा- कंधार विधानसभेचे लोकप्रिय आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत कंधारच्या पंचायत समिती सभागृहात संपन्न झाली. या बैठकीस कंधार येथील अनेक सरपंच तसेच नागरिकांची उपस्थिती होती.

आलेल्या मतदारसंघातील नागरिकांच्या पाणी टंचाई मागण्या तसेच इतर समस्या आमदार महोदयांनी ऐकून घेतल्या , त्यामध्ये गावातील पाणी पाईपलाईन, बोरअधिग्रहण, विहीर, शेतीच्या पाणी विषयक समस्या त्याचप्रमाणे विजेच्या समस्या तसेच ग्रामपंचायती मधील इतर समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना आयोजित पाणीटंचाई कृती आराखडा आढावा बैठकीत त्या त्या विभागांना दक्ष राहण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

तालुक्यातील विविध गावांतील पाणीपुरवठा योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. गावनिहाय विहिरी व बोअरवेलची सद्यस्थिती, उपलब्ध जलसाठा, भूजल पातळीतील घट याची माहिती सादर करण्यात आली. तसेच काही भागात टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची आवश्यकता भासू शकते, यावर चर्चा करण्यात आली. जलस्रोतांचा प्रभावी व काटेकोर वापर, बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजनांची तातडीने दुरुस्ती, पर्यायी स्रोत उपलब्ध करून देणे आणि आवश्यक त्या ठिकाणी आगाऊ नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्रशासन व ग्रामपंचायतींनी समन्वय ठेवून काम केल्यास पाणीटंचाईची समस्या मोठ्या प्रमाणात टाळता येईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणीप्रश्न गंभीर होऊ नये, यासाठी प्रभावी नियोजन व तत्पर अंमलबजावणीवर भर देण्यात याव्यात अशा ही सूचना करण्यात आल्या.

यावेळी पंजाबराव जोगदंड,प्रवीण पाटील चिखलीकर,बाबुराव गिरे,किशन डफडे,उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी,सुधाकर कौशल्य,चंदनफुले,भगवान राठोड,अविनाश गीतेसह आजी/माजी ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्षासह तालुक्यातील ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक व पत्रकार , अधिकारी - कर्मचारी तसेच असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

